रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ३५ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ११ जुलै २०२५

किंमत ४ ₹

## कल्याणमध्ये डेंग्यूचा पहिला बळी

कल्याण : कल्याणमध्ये डेंग्यूने डोकेवर काढले असून या आजाराने पहिला बळी गेल्याची माहिती समोर आली आहे. कल्याण बेतुरकरपाडा या परिसरात राहणाऱ्या विलास म्हात्रे या तरुणाचा डेंग्युमूळे मृत्यू झाल्याचं समोर आले आहे. आतापर्यंत केडीएमसी हद्दीत डेंग्यूचे ३५ रुग्ण आढळलेले आहेत. तर जवळपास तीनशे पन्नास घरांजवळ कंटेनर आणि ड्रममध्ये डेंग्यूच्या आळ्या देखील सापडल्या. या प्रकाराने सतर्कतेचे आवाहन करण्यात आलं आहे. कल्याणमधील विलास म्हात्रे या तरुणाचा डेंग्युने मृत्यू झाला आहे.




## सातघरमधील वहिवाटीचा रस्ता बंद

### बांधकाम व भरावामुळे जाण्या येण्याचा मार्ग बंद | परिसरातील शेकडो एकर जमीन नापीक होण्याची भिती

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील सातघर येथे शेतावर जाण्यासाठी वहिवाटीचा रस्ता पूर्वपरंपरागत चालू होता. परंतु त्याच रस्त्यावर सिमेंटचे बांधकाम व भराव करून हा रस्ताच बंद करण्यात आला आहे. पेढांबेचे सरपंच यांच्या सुपुत्राने दादागिरी करीत हा प्रताप केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. भराव व बांधकामामुळे बाजूच्या गावाना पुराचा धोका निर्माण होण्याबरोबरच शेतावर जाण्या येण्याच्या मार्गाला अडथळा निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम परिसरातील शेकडो एकर जमीन नापीक होण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदार यांच्याकडे तक्रार करूनही अजूनपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्याचे ही शेतकरी, ग्रामस्थांनी सांगितले. •> सविस्तर वृत्त पान ३ वर

## वेधक

### खा. श्रीकांत शिंदेंना ‘आयकर’ची नोटीस

मुंबई : शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांना आयकर विभागाने नोटीस धाडली आहे. त्यांच्यासह मंत्री संजय शिरसाट यांनाही नोटीस मिळाली आहे. शिरसाट यांच्या संपत्तीवरुन मागच्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोप सुरु होते. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या उत्पन्नात झालेल्या वाढीमुळे त्यांना नोटीस बजावण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. छत्रपती संभाजी नगर येथील व्हिट्स हॉटेल प्रकरण सिरसाट यांच्या अंगलट आल्याची येण्याची शक्यता आहे. याच हॉटेलच्या खरेदी व्यवहारावरुन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आवाज उठवला होता.

### गोऱ्हेंच्या रक्षकांची सरदेसाईंना धक्काबुक्की

**मुंबई :** विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या सुरक्षा रक्षकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई यांच्यासोबत धक्काबुक्की केल्याचा धक्कादायक प्रकार विधिमंडळ परिसरात घडला. नीलम गोऱ्हे यांच्यासमोर हा प्रकार घडला. यामुळे वरुण सरदेसाई यांनी संताप व्यक्त केला. यामुळे विधिमंडळ परिसरामध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गुरुवारी दुपारच्या सुमारास विधिमंडळ परिसरात नीलम गोऱ्हे यांच्या सुरक्षा रक्षकांनी धक्काबुक्की केली. धक्कादायक म्हणजे असा प्रकार फक्त एकदाच नाही तर दोन वेळा घडला. दुसऱ्यांदा आपल्याला धक्का लागल्याचा आरोप वरुण सरदेसाई यांनी केला.

# विधेयकात बदल अपेक्षित

## शेकाप नेते जयंत पाटील यांनी व्यक्त केली आशा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

**जनसुरक्षा विधेयक हे लोकशाही अधिकारांवर गदा आणणारे, नागरी स्वातंत्र्याची गळचेपी करणारे आहे. त्यामुळे शेकापसह राज्यातील पुरोगामी विचारांच्या पक्षाने या विधेयकाला विरोध दर्शविला आहे. जनतेने केलेला विरोध लक्षात घेऊन या विधेयकावर संयुक्त चिकित्सा समिती स्थापन करम्यात आली होती. या समितीच्या माध्यमातून चर्चेअंती बदल करण्यात आले आहेत. विधीमंडळात गुरुवारी (दि.१०) या विधेयकावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी चर्चा केली. त्यानंतर विधेयक विधानपरिषदेत चर्चेला जाणार आहे. चर्चेनंतर राज्य सरकार या जनसुरक्षा विधेयकात बदल करेल, अशी अपेक्षा शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त केली आहे.**

जनसुरक्षा विधेयक मंजूर झाल्यावर संप करता येणार नाही. आंदोलन केल्यास सहा महिने जामीन मिळणार नाही, अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. जनसुरक्षा विधेयक सर्वसामान्यांवर अन्यायकारक आहे. जनसुरक्षा विधेयकाला यापुर्वी अधिवेशनात विरोध दर्शविला होता. जमावबंदी मोडल्यास शांततामय मोर्चा, उपोषण बेकायदेशीर ठरू शकणार आहे. कामगार, सरकारी कर्मचारी यांना संप करता येणार नाही. सामाजिक प्रश्नांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्रास देण्यासाठी या कायद्याचा हत्यार म्हणून वापर केला जाऊ शकतो. चळवळींचा विरोध मोडून काढण्यासाठी या कायद्याचा वापर होऊ शकतो. जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

आजही देशासह राज्यात उजवी विचारसरणी संविधानाबरोबरच लोकशाही मानत नाहीत. त्यामुळे जनसुरक्षा विधेयक डाव्या विचारसणीला टारगेट करून आणण्यापेक्षा उजव्या विचारणी असलेल्या •> पान २ वर



### नवीन कायद्याची गरज काय?

जे कायदे अस्तित्वात आहेत. त्या कायद्याने नक्षलवाद कमी झाले आहेत. त्यामुळे नवीन कायदा निर्माण करण्याची गरज नाही. गेल्या दोन वर्षापासून सरकार जनसुरक्षा विधेयक कायदा आणण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र जनतेच्या हितासाठी असलेले कायद्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. जे कायदे कालबाह्य झाले आहेत. ते रद्द करण्याचे काम विधीमंडळाचे आहे. या कायद्याचा दुरुपयोग होऊ शकतो. नुसत्या डाव्या विचारसरणीच्या संघटनेला टारगेट करून जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यावर भर देणे चुकीचे आहे. देशासह राज्यात उजव्या विचारसरणीच्या अतिरेकी संघटना आहेत. मालेगाव येथील बॉम्ब स्फोटप्रकरण सर्वांनाच ज्ञात आहे. त्यामुळे सरकारने हा कायदा मंजूर करताना विचार करणे गरजेचे असून सरकारकडून यात बदल होईल अशी अपेक्षा आहे, असेही जयंत पाटील म्हणाले.

> “सरकार जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे. रस्त्यांवर कोणी उतरत नाही. पोलीस आधीच लोकांना मारत आहेत. ह्या विधेयकानंतर आणखी बेलगाम होतील. विरोधकांनी टीका केली, रस्त्यावर उतरले तर तुरुंगात टाकतील. असं बिल आणण्याची गरज नाही. हा सत्ता पक्षाचा अहंकार आहे.”
>
> – आ. अबू आझमी, समाजवादी पक्ष

> “जनसुरक्षा विधेयकाबाबत सुधारणा मागितल्या आहेत. या सुधारणा काय आहेत हे त्यांनी सांगितलं नाही. या विधेयकात सरकारच्या विरोधात बोलायचे, मोर्चा काढायचा अधिकार नाही. लोकशाहीत हुकूमशाही चालू देणार नाही. आमच्या विरोधात बोललात तर मुद्दाम तुम्हाला नक्षलवादी ठरवण्यात येईल असं सरकारचं धोरण आहे.”
>
> – नाना पटोले, काँग्रेस

## मोरबे धरणग्रस्तांचा जलसमाधीचा इशारा



। खोपोली । प्रतिनिधी ।

मोरबे धरण प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने कृती समितीकडून साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. सरकारकडून न्याय न मिळाल्यास जलसमाधी घेण्याचा निर्धार प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. गतवर्षी ४ जुलैला झालेल्या उग्र आंदोलनानंतर प्रशासनाने प्रकल्पग्रस्तांना अनेक आश्वासने दिली होती; परंतु त्यातील एकाही आश्वासनाची पूर्ती न झाल्याने पुन्हा साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे. सरकार निर्णय घेत नसल्याने जलसमाधीचा निर्णय घेतल्याचा आरोप प्रकल्पग्रस्त समितीने केला आहे.

मोरबे धरणासाठी १९९० मध्ये आठ गावे व सात आदिवासी वाड्यांमधील शेतजमिनींचे भूसंपादन करण्यात आले होते. ३४ वर्षे उलटूनही परिसरातील ९०० कुटुंबांना पुनर्वसनासाठी झगडावे लागत आहे. भूसंपादन कायदा २०१३ नुसार, •> पान २ वर

> **“मोरबे धरण प्रकल्पग्रस्त कृती समिती उपोषणाची दखल जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी घेतली असून शुक्रवारी (दि.११) जिल्हाधिकारी कार्यालयात तातडीची बैठक आयोजित केली आहे; मात्र या वेळी खोट्या आश्वासनाला भुलणार नाही. सर्व मागण्या मान्य करून तसे लेखी आश्वासन मिळाले तरच उपोषण मागे घेण्यात येईल, अन्यथा जलसमाधी घेणार आहोत.”**
>
> – अंकुश पदू वाघ, उपाध्यक्ष, मोरबे धरण प्रकल्पग्रस्त कृती समिती

## महिलांच्या सुरक्षेसाठी रस्त्यावर उतरणार

### शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड.मानसी म्हात्रे



। अलिबाग । प्रतिनिधी ।

ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील नामंकित शाळेतील घटना निंदनीय आहे. शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. अशा घटनांकडे सरकार आणि महिला आयोगाचा अंकुश राहिला नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. शाळेतील मुलींसह महिलांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या न्यायासाठी पुढील काळात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिला. तसेच मुलींची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी सरकारने शासन स्तरावर स्वतंत्र समिती गठीत करून या समितीमध्ये सर्वपक्षीय प्रतिनिधी असावे, अशी मागणी केली आहे.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षापासून महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटना वाढत आहे. सातत्याने या घटना घडत आहेत. अल्पवयीन मुलींसह वयोवृध्द महिलांना अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील नामांकित शाळेतील घटना निंदनीय आणि किळसवाणी आहे. तीव्र शब्दात या घटनेचा निषेध व्यक्त केला जात आहे. महिला व मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळांवरील प्रशासनावर सरकारचा अंकुश राहिला नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना सातत्याने घडत आहे. विद्यार्थीनी, महिला कर्मचारी यांच्या सुरक्षेबाबत हलगर्जीपणा केला जात आहे. सुरक्षेसाठी रस्त्यावर उतरून न्याय मागण्याची शेतकरी कामगार पक्षाची भूमिका राहणार आहे. पिडीत मुली, महिलांसह त्यांच्या पालकांच्या न्याय हक्कासाठी पुढील काळात तीव्र आंदोलन केले जाईल.

महाराष्ट्र सरकार आणि महिला आयोग मुलींसह महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास अपयशी होताना दिसत आहे. शाळकरी मुलींसह महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत असताना न्यायाची भूमिका पार पाडत नाही. यांचा अंकुश राहिला नाही, ही मोठी •> पान २ वर



> **“ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथील एका नामांकित शाळेतील घटना निंदनीय आहे. या घटनेनंतर मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर झाला असून विद्यार्थीनींमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. संपूर्ण महाराष्ट्र या घटनेने हादरुन गेला आहे. या घटनेचा शेकापच्या वतीने तीर्व निषेध व्यक्त केला जात असून संबंधितांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, ही मागणी आहे.”**
>
> – चित्रलेखा पाटील – शेकाप प्रवक्त्या तथा मिडीया सेल अध्यक्षा

## उरणच्या मासेमारी जाळ्यांना आंध्रप्रदेशच्या कारागिरांची वीण

। उरण । प्रतिनिधी ।

जूनपासून राज्यातील खोल समुद्रातील मासेमारी बंद आहे. या कालावधीत मच्छीमार आपल्या जाळ्यांच्या दुरुस्तीच्या कामाला लागले आहेत. मासेमारीसाठी वापरण्यात येणारी महाकाय जाळी दुरुस्तीसाठी आंध्रप्रदेश आणि कोकणातील करागीरांचा हात महत्त्वाचा आहे. ही जाळी शिवण्यासाठी जवळपास ४०० पेक्षा अधिक कारागीर चार ते पाच महिन्यासाठी करंजा बंदरात मुक्काम करतात. हे कारागीर तासाला १०० रुपये या दराने काम करतात.

खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या बोटीवर २०० फुटांपेक्षा लांब व पन्नास ते साठ फूट रुंद अशा



जाळी वापरण्यात येते. मासळी पकडत असताना सुरमई आणि बगा तसेच इतर माशांमुळे जाळी तुटते, नादुरुस्त होते. ही जाळी दोन महिन्यांच्या बंदी काळात दुरुस्ती करण्याची कामे करण्यात येतात. महाकाय अशी जाळी बोटींवरून चढ-उतार करण्यासाठी मोठ्या वाहनांची मदत घेतली जाते. या जाळ्यांची दुरुस्ती करणे हे जिकरीचे काम आहे.

मशीनच्या सहाय्याने तयार करण्यात आलेली ही जाळी शिवण्याचे कौशल्य हे आंध्रप्रदेशमधील मच्छिमारांना आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून हे काम त्यांच्याकडून केले जात आहे. जून ते जुलै या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी मासेमारी बंदी असल्याने प्रामुख्याने हे काम या दोन महिन्यांपासून सुरू होते. मात्र आंध्रप्रदेशमधील कारागीर हे मे महिन्यापासूनच करंजा बंदरात दाखल होतात. ते गणेशोत्सवापर्यंत काम पूर्ण करून आपल्या राज्यात परततात, अशी माहिती करंजा येथील मच्छिमार नेते रमेश नाखवा यांनी दिली.

## गणेशोत्सव आता ‘महाराष्ट्र राज्य महोत्सव’

### आशिष शेलार यांची विधानसभेत घोषणा

। मुंबई । प्रतिनिधी ।

१०० वर्षांहून अधिक वर्षांची मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला ‘महाराष्ट्र राज्य महोत्सव’ म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी ही घोषणा विधानसभेत केली.

विधानसभेत निवेदन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव १८९३ साली लोकमान्य टिळकांनी सुरू केला. या उत्सवाची पार्श्वभूमी ही सामाजिक, राष्ट्रीय, स्वतंत्रता, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे. महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असलेला गणेशोत्सव आहे. देशात नाहीतर जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटिबद्ध राहील.

पीओपीच्या परंपरागत मूर्तींवर बंदी आणताना पर्यावरणपूरक अन्य पर्यायांना समोर ठेवून, या विषयावर सखोल अभ्यास करण्याची भूमिका घेतली. राजीव गांधी विज्ञान आयोगामार्फत काकोडकर समितीचा अहवाल घेतला. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादवजी यांनी संमती दिली आणि जे निर्बंध होते तेही बाजूला निघाले. न्यायालयाच्या निवाड्यानुसार •> पान २ वर

## खारघरमध्ये उभारणार अंतराळ संग्रहालय




। पनवेल । वार्ताहर ।

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्यावतीने शहरात लवकरच विज्ञान आणि अंतराळ अभ्यासावर आधारित एक भव्य अंतराळ संग्रहालय उभारण्यात येणार आहे. खारघर येथील सेक्टर ३४ मधील प्लॉट क्रमांक ०८ या जागेवर हे अत्याधुनिक संग्रहालय उभारण्याचा प्रस्ताव असून, यासाठी ४१.३४ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

भविष्यातील वैज्ञानिक पिढी घडवण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व अंतराळ संशोधनाची रुची निर्माण होण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी •> पान २ वर

### ३०० अपदा मित्रांसह रबरी बोट | सतर्कतेचा इशारा देण्यासाठी ९१ अलर्ट सिस्टीम

## आपत्तीशी सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

रायगड जिल्ह्यामध्ये जूलै महिन्यात अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती आणि दरड कोसळण्याच्या घटना वारंवार घडतात. दरवर्षी या कालावधीत मोठी वित्तहानीबरोबरच जीवितहानी होते. जुलै महिना उजाडला असून या महिन्यात अतिवृष्टी होण्याची नाकारता येत नाही. त्यामुळे आपत्तीपासून बचाव करण्यासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे.

अपदा मित्रांसह अलर्ट सिस्टीम, सेटेलाईट, रबर बोट अशा अनेक सुविधा उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन



विभागाकडून देण्यात आली आहे.

जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून मुसळधार पाऊस पडण्यास सुरुवात होते. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हा पाऊस सुरूच राहतो. या पावसामध्ये महाडसह पोलादपूर, खालापूरमधील इर्शाळवाडी अशा अनेक भागात दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. या दरडीमध्ये अनेकांचा जीव गेला आहे. अतिवृष्टीमुळे रोहामधील कुंडलिका नदी, सावित्री नदी अशा अनेक प्रमुख नद्यांसह अन्य नद्या पाण्याने तुडूंब भरतात. अलिबाग तालुक्यातील रामराज नदीसह गावामध्ये पुरजन्य परिस्थिती निर्माण होते. महाड गावदेखील पाण्याखाली जातो. जुलै महिन्यामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्यापासून पुर येण्याची परंपरा कायमच आहे. या कालावधीत सर्वच यंत्रणाची धावाधाव सुरू होते. आपत्कालीन परिस्थितीशी सामना करताना तारेवरची कसरत होते. जुलै महिना उजाडला असून या महिन्यात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

जिल्ह्यात ३९२ दरडग्रस्त आणि १३६ पुरग्रस्त गावे आहेत. अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त दरडग्रस्त भागांमध्ये आपदा मित्रांची मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यात ३०० अपदा मित्र आहेत. पुराच्या वेळी पाण्यात अडकलेल्या नागरिकांना काढण्यासाटी रबरी बोटीची व्यवस्था केली आहे. जिल्हयात १४ बोटी आहेत. दरडीसह पुरग्रस्त गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यासाठी ९१ अलर्ट सिस्टीम बसविण्यात आले आहेत. वातावरणातील बदलत्या हवामानाची माहिती उपलब्ध होण्यासाठी ६० स्वयंचलित हवामान केंद्र, पर्जन्यमापक यंत्र ६०, सेटेलाईट फोन २० आहेत.

## परमबीर सिंह यांना क्लिनचीट

। ठाणे । वृत्तसंस्था ।

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह, सुनील जैन आणि संजय पुनामिया यांच्यासह पाच जणांविरोधात सुमारे पाच कोटी रुपयांची खंडणी उकळल्याच्या आरोपाखाली कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता तर, जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपाखाली कल्याणच्या बाजारपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या दोन्ही प्रकरणाचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण शाखेमार्फत (सीबीआय) सुरू होता. या दोन्ही गुन्ह्याचा सीबीआयने तपास करून परमबीर यांना क्लिनचीट दिली असून तसा अहवाल त्यांनी न्यायालयात सादर केला आहे.

## पाचवी व आठवीचा शिष्यवृत्तीचा निकाल जाहीर

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे. इयत्ता पाचवीचा निकाल २३.०९ टक्के, तर इयत्ता आठवीचा निकाल १९.३० टक्के लागला.

एकूण निकालामधील ३१ हजार ७८६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून, त्यात इयत्ता पाचवीमधील १६ हजार ६९३ विद्यार्थ्यांचा, तर आठवीतील १५ हजार ९३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने इयत्ता पाचवी आणि इयत्ता आठवीसाठी ९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली होती. या परीक्षेसाठी राज्यभरातून ९ लाख ४४ हजार ४६३ विद्यार्थांनी नोंदणी केली होती. शिष्यवृत्तीसाठी नोंदणी केलेल्यांमध्ये इयत्ता पाचवीतील ५ लाख ६६ हजार ३६८, तर इयत्ता आठवीसाठी ३ लाख •> पान २ वर

### किती मिळते शिष्यवृत्ती

**इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील तीन वर्षासाठी वार्षिक पाच हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते. तर इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुढील दोन वर्षासाठी वार्षिक साडेसात हजार रुपये इतकी मिळते.**

# सर्वेश झाला फायनान्स मास्टर्स

## ● माजी सैनिकाच्या मुलाचे सर्वत्र कौतुक

। अलिबाग । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथील सर्वेश श्रुती सुनील पारकर याने जिद्द व ध्येयाने इंग्लंड येथील बांगोर युनिव्हर्सिटीमध्ये विद्यापिठातून डिस्टिंक्शन मध्ये उत्तीर्ण होत पदव्युत्तर बँकिंग आणि फायनान्स विषयात मास्टर्स पदवी संपादन केली आहे. नुकतेच इंग्लंड मधील विद्यापीठात एका शानदार पदवी प्रदान (कन्व्होकेशन) समारंभात सर्वेश पारकर याला सन्मानित करण्यात आले आहे

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथील असणारा सर्वेश अभ्यासात अत्यंत हुशार, मनमिळाऊ पण तितकाच खोडकर होता शिवाय लहानपणा पासून आर्मी स्कूल ते पुढे दहावी पर्यंत शिक्षण व त्यानंतर नॉवेल



इन्स्टिट्यूट एकरावी व बारावी सायन्स व पुण्यातील गरवारे उच्चभ्रू विद्यापीठातून बॅचलर डिग्री घेतली नंतर पुढे त्याने परदेशातून मास्टर्स डिग्री करण्याचे ठरवले व त्यासाठी काही ऑनलाईन त्याने दिल्या त्यात त्याला उत्तम मार्क्स आणि साडे चार लाख कॉलरशिप मिळवून पुढे एज्युकेशन लोन व बाकी बाकीचे सर्व गोष्टीचा वर्ष भर अभ्यास करून त्याने आपले निर्णय पालकांना सांगितले. काही वेळासाठी त्यांनी हे शक्य होईल का ही शंका घेतली पण त्यांचे आत्मविश्वास आणि निर्धार बघून त्यांनी त्याला पूर्णपणे सहाय्य केले.

सर्वेश पारकर याचे वडील सुनील पारकर हे निवृत्त सैनिक असून आई श्रुती पारकर या अभिनेत्री आहेत. पुढील उच्च शिक्षण साता-समुद्रापार इंग्लड येथील बांगोर युनिव्हर्सिटीमधुन डिस्टिंक्शन मिळवून मास्टर्स इन बँकिंग अँड फायनान्स पदव्युत्तर पदवी संपादीत करत उज्ज्वल यश प्राप्त केले आहे.

सर्वेशमध्ये जन्मजात उत्तम संघटन कौशल्य त्याचे ठायी असल्याने त्याचा मित्र परिवारही खुप मोठा आहे. अनेक सामाजिक कार्यातही तो हिरीने सहभागी होतो. भारतात असताना त्याला रक्तदान केलेच पण तिकडे प्रदेशातही तो रक्तदान करतोय. आर्थिक उद्योगातील उत्पादने आणि सेवांसाठी नाविन्यपूर्ण असे तंत्रज्ञान संपादन केल्याने सर्वेशला पुढील आयुष्यातील वाटचालीत नक्कीच उपयुक्त ठरेल. सर्वेशचे संपूर्ण श्रीवर्धनकरांकडुन कौतुक होत असुन सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# नेरळनजिक दोन कार आणि दुचाकीचा अपघात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत नेरळ राज्यमार्ग रस्त्यावर एलएईएस शाळेच्या बाजूला राज्यमार्ग अरुंद होतो. त्या ठिकाणी कर्जत कडून येणाऱ्या दोन कार यांनी दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाले आहेत. या राज्य मार्गावर अपघाताची मालिका सुरूच असून मागील आठवड्यात एका दांपत्याचा मृत्यू झाला होता.

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ एलएईएस हायस्कूलच्या पुढे अरुंद रस्त्या ठिकाणी भीषण अपघात घडला आहे. कर्जत दिशेकडून नेरळ देशाकडे जाणारी आय ट्वेंटी एम.एच ४६ बी.ई ६२०० ही चार



चाकी वाहनाने नेरळ दिशेकडून कर्जत दिशेकडे जाणारी चार चाकी वाहन अल्टो एम.एच ०३ ए.आर २३५७ या गाडीला अरुंद रस्त्यामुळे आय ट्वेंटी या गाडीने धडक दिली असता समोरून येणारी दुचाकी वाहन ही नेरळकडून कर्जत दिशेकडे जात होती.

एम.एच ४६ बी.ई ६२०० या चार चाकी वाहनाने दुचाकी वाहन एम.एच. ४६ ए.ए ८२५७ या गाडीला जोरदार धडक दिल्याने त्या गाडीचा चक्काचूर झाला असून दुचाकी वाहन चालक हा गंभीर जखमी झाला आहे.सदर जखमी तरुण प्रल्हाद कनोजिया हा नेरळ बस स्टॉप साई बाबा मंदिर येथील राहणारा असून सदर अपघातानंतर आय ट्वेंटी गाडीचे मालक ज्ञानेश्वर धुळे यांनी नेरळ खांडा येथील धन्वंतरी नर्सिंग होम डॉक्टर शेवाळे यांच्याकडे जखमी तरुणास नेण्यात आले.

दरम्यान त्यांच्यावर प्रथम उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी रायगड हॉस्पिटल डिकसळ येथे नेण्यात आले आहे. या अपघातात एक तरुण गंभीर जखमी झाला असून इतर कोणत्याही व्यक्तीला कोणतीही दुखापत झालेली नाही परंतु वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.

पान १ वरून

## विधेयकात बदल अपेक्षित

भूमिकेचादेखील विचार करणे आवश्यक आहे. या कायद्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने याबाबत विचार करणे आवश्यक आहे, असे शेकाप नेते जयंत पाटील म्हणाले.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येणार असल्यामुळे वादग्रस्त ठरलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात गुरूवारी मंजूर करण्यात आले. विरोधकांसह जनतेने या विधेयकाला जोरदार विरोध केल्यामुळे सरकारने हे विधेयक मांडताना त्यातील काही तरतुदी सौम्य केल्या. विधीमंडळ सचिवालयाने जनतेकडून तब्बल १२,५०० हून अधिक सूचना स्वीकारल्या. मात्र त्या हरकती नेमक्या काय आहेत, याबाबत कोणीही बोलत नसल्याचा आरोप आ. रोहित पवार यांनी केला आहे.

## महिलांच्या सुरक्षेसाठी रस्त्यावर उतरणार

चिंतेची बाब आहे.

सरकारने महिला, मुलींच्या अत्याचारांच्या घटनांबाबत गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. शाळेतील विद्यार्थीनी, महिला कर्मचारी यांच्या सुरक्षेसाठी शासन स्तरावर स्वतंत्र समिती गठीत होणे गरजेचे आहे. या समितीमध्ये सर्वपक्षीय प्रतिनिधी असावे. तरच न्याय, सुरक्षा अबाधित राहू शकते ही शेतकरी कामगार पक्षाची मागणी आहे, असे शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केली आहे.

## खारघरमध्ये उभारणार अंतराळ संग्रहालय

उपक्रम असणार आहे. तसेच सामान्य नागरिकांनाही अंतराळाची माहिती होण्यासाठी हे अंतराळ संग्रहालय उपयुक्त ठरणार आहे.

आज झालेल्या सर्वसाधारण प्रशासकीय सभेने या प्रकल्पास मान्यता दिली आहे. हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी दिली आहे.

## पाचवी व आठवीचा शिष्यवृत्तीचा निकाल जाहीर

७८ हजार ९५ विद्यार्थ्यांचा समावेश होता. यापैकी ९ लाख १३ हजार २५८ विद्यार्थी होते.

परिक्षेत इयत्ता पाचवीतील ५ लाख ४७ हजार ५०४, तर इयत्ता आठवीतील ३ लाख ६५ हजार ७५४ विद्यार्थ्यांचा समावेश होता. या दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षांचा अंतरिम निकाल २५ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला. गुणपडताळणीसाठी शाळांकडून २५ एप्रिल ते ४ मे या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. परिषदेने या कालावधीमध्ये आलेले अर्ज निकाली काढून अंतिम निकाल व गुणवत्ता यादी जाहीर केली. परिषदेने जाहीर केलेल्या निकालानुसार इयत्ता पाचवीतील १ लाख ३० हजार ८४६ आणि इयत्ता पाचवीतील ७० हजार ५७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के इतका लागला असून, यामध्ये इयत्ता पाचवीचा निकाल २३.०९ टक्के, तर इयत्ता आठवीचा निकाल १९.३० टक्के इतका आहे. तर शासनमान्य मंजूर संचानुसार शिष्यवृत्तीसाठी पाचवीतील १६ हजार ६९३ विद्यार्थी, तर आठवीतील १५ हजार ९३ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

## मोरबे धरणग्रस्तांचा जलसमाधीचा इशारा

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने सामाजिक परिणाम अहवाल सादर करून १२ पट मोबदल्यासह भूसंपादन व पुनर्वसन करावे, अशी मागणी धरणग्रस्तांची आहे. गतवर्षीच्या आंदोलनानंतर ३१ जणांवर गुन्हे दाखल झाले होते. हे गुन्हे मागे घेण्यात यावे, अशी मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली आहे. साखळी उपोषणाच्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खालापूर पोलीस याठिकाणी तैनात आहेत.

## गणेशोत्सव आता 'महाराष्ट्र राज्य महोत्सव'

पीओपी मूर्ती बनवणे, डिस्प्ले करणे आणि विकणे यालाही परवानगी मिळाली.

गणेशोत्सवाच्या बाबतीत पोलीस सुरक्षा, आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर तसेच कसबामध्ये आणि विशेषता पुणे व मुंबईतल्या महोत्सवाला लागेल तेवढा निधी राज्य सरकार खर्च करेल. कारण गणेशोत्सव उत्साहाने साजरा करणे ही शासनाची भूमिका आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांना यानिमित्ताने माझी विनंती आहे की, आपण जे वेगवेगळे देखावे करता. त्यामध्ये आपले सैन्य, सैनिक, सामाजिक उपक्रम, ऑपरेशन सिंदूर, देशांतर्गत विकासाची कामे, आपले महापुरुष अशा सगळ्या गोष्टींच्या विचार करावा. सामाजिक भान, पर्यावरणपूरक आणि उत्साहात साजरा होणारा हा गणेशोत्सव हा महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित करताना आम्हाला आनंद होतो आहे, असे निवेदन त्यांनी केले.

## आपत्तीशी सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज

असू शकते. पण यावेळी आयोगाने स्पेशल इंटेंसिव रिव्हिजन नावाने ही प्रक्रिया सुरु केली आहे. २००३ मध्येही अशीच प्रक्रिया राबवण्यात आली होती, पण तेव्हा मतदारांची संख्या खूप कमी होती. आता राज्यात ७ कोटींहून अधिक मतदार आहेत आणि ही प्रक्रिया फार जलद गतीने राबवली जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या अधिकारांवर परिणाम होऊ शकतो, असे शंकरनारायणन म्हणाले.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/५०२५/प्र.क्र.०२/२३९८/२०२५ दिनांक:१०/०७/२०२५

**शुध्दीपत्रक**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/३१/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, खारघर मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधणे. | १२,४८,२१,१३१/- |
| २. | PMC/CE/३२/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब, कळंबोली मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधणे. | १५,५५,१५,०२६/- |
| ३. | PMC/CE/३३/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क, कामोठे मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधणे | ७,०९,४५,३४९/- |
| ४. | PMC/CE/१३/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ड, पनवेल (पूर्व व पश्चिम) मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधणे. | १०,२०,८६,९६५/- |

या कामाच्या ई-निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या :http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ११/०७/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका**

**श्रीवर्धन नगरपरिषद, जि. रायगड**

**कर विभाग जाहिर दरपत्रक फेर निविदा सूचना क्र. ०१ २०२५-२६**

क्र. श्रीनप/कवि/निविदा सूचना/०४८७/२०२५ दिनांक :- १०-०७-२०२५

श्रीवर्धन नगरपरिषद इच्छुक ठेकेदार/ पुरवठादार यांचेकडून दोन स्टील कपाट खरेदी करणे या कामाकरिता द्विलिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागवित आहे. निविदा प्रपत्र, निविदा फॉर्म नगरपरिषद कार्यालय श्रीवर्धन येथे कार्यालयात वेळेत दिनांक ११/०७/२०२५ ते १८/०७/२०२५ पर्यंत निविदा फॉर्म फी रक्कम भरणा करून प्राप्त करून घेता येतील. तपशीलवार निविदा कर विभागामध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**श्रीवर्धन नगरपरिषद**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने सर्व लोकाना कळविण्यात येते की, मौजे पावसाळवाडी, ता. सुधागड, जि. रायगड येथिल सदर मिळकत श्री. गणपत दशरथ मोहीते, वय ५२ वर्ष, धंदा शेती, रा. परळी, ता. सुधागड, जि. रायगड ४१० २०५, यांच्याकडून आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत आम्ही त्यांचे कडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :–

| अ. नं. | सर्व्हे नंबर | हिस्सा. नंबर. | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १६ | ९ | १-२५-०० | ०-२५ |

वरील वर्णनाच्या मिळकतीशी कोणाही इसमाचा दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, वहिवाट, अगर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्याने खाली दिलेल्या पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिवसापासून पंधरा दिवसाचे आत आपली लेखी हरकत सकृत दर्शनी पुराव्यासह कळवावी वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत न आल्यास आम्ही खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करु व त्यानंतर कसलीही तक्रार आमचेवर बर्धनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

**सही**

**ठिकाण :- मुंबई**
**दि. ११/ ०७/ २०२५**

**ॲडव्होकेट विनया वाघ**
**ऑफीस क्रं. १०, बाहुबली बिल्डींग,**
**कवासजी मार्ग, फोर्ट मुंबई -४०० ००१**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने सर्व लोकाना कळविण्यात येते की, मौजे पावसाळवाडी, ता. सुधागड, जि. रायगड येथिल सदर मिळकत श्री. गणपत दशरथ मोहीते, वय ५२ वर्ष, धंदा शेती, रा. परळी, ता. सुधागड, जि. रायगड ४१० २०५, यांच्याकडून आमचे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत आम्ही त्यांचे कडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :–

| अ. नं. | सर्व्हे नंबर | हिस्सा. नंबर. | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १६ | १० | ०-८७-०० | ०-२५ |

वरील वर्णनाच्या मिळकतीशी कोणाही इसमाचा दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, वहिवाट, अगर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्याने खाली दिलेल्या पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिवसापासून पंधरा दिवसाचे आत आपली लेखी हरकत सकृत दर्शनी पुराव्यासह कळवावी वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत न आल्यास आम्ही खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करु व त्यानंतर कसलीही तक्रार आमचेवर बर्धनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

**सही**

**ठिकाण :- मुंबई**
**दि. ११/ ०७/ २०२५**

**ॲडव्होकेट विनया वाघ**
**ऑफीस क्रं. १०, बाहुबली बिल्डींग,**
**कवासजी मार्ग, फोर्ट मुंबई -४०० ००१**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. नामदेव गोमा ठाकुर आणि श्री. अमित नामदेव ठाकुर, यांनी मौजे तळवली, ता. मुरूड, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक कृष्णा राजाराम काटकर, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरूड जि. रायगड | ८ | वरकस ०-८३-०० पो.ख. ०-२०-०० एकुण क्षेत्र ०-९३-०० | ०.७५ |

सदरहू वर्णन केलली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कवजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २०/०७/२०२५
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु. वरसोली, बुरूमखाण
ता. अलिबाग, जि. रायगड

**जाहीर सुचना**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री संतोष आनंद नायर याच्याकडून कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे नांदगाव, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७४/२/क यांचे एकुण क्षेत्र १.६०.०० गुंठे ही मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लोज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे व मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १०/०७/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता : मु.पो कडाव ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलानी मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि.रायगड येथील, अलिबाग नगरपरिषद हद्दीतील, सिटी सर्व्हे नं. ७९९अ, ७९९ब, ७९९/२ अ व ७९९/३ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''मंगलपुष्प सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अलिबाग'', तालुका अलिबाग, जिल्हा रायगड या संस्थेतील इमारतीच्या, तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.३०१, बिल्ट अप क्षेत्र ६५३ चौ. फुट (६६.६६ चौ.मी), अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक.१०७९ (ALB000001357) ही निवासी सदनिका मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. महेश रामचंद्र नायकर व सौ.ज्याती महेश नायकर यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले असून त्या अनुषंगाने विद्यमान मालकांनी आमचे अशिलाकडून बयाणा रक्कम स्विकारलेली आहे सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कोर्ट केस अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, व असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून व मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली कोणतीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १०/०७/२०२५

**(ॲड. महेश एकनाथ घरत)**
'गुरूकृपा' मु.पो. खंडाळे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८२२६३५५१२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वरई तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक मिलिंद दिनकर कोर यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २८ | ८ | ०-३६-६० | १-५५ |

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेली मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील वर्णनाच्या मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०७/२०२५

**ॲड.शिल्पी प्रशांत परदेशी**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता.रत्नदुर्ग अपार्टमेंट,
हनुमान मंदिर जवळ, पाटील आळी कर्जत,
ता.कर्जत, जि.रायगड - ४१०२०१.

जा.क्र न्यायशाखा १४०९/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग अलिबाग
कल्पतरू इमारत मुख्य पोस्ट ऑफिसजवळ,
ता.अलिबाग, जि.रायगड, पिन कोड-४०२२०१
दि. १०/०७/२०२५

**चौकशी जाहीर नोटीस**
**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०चे कलम २२ अन्वये**

बदल अर्ज क्र.२०६/२०२५
सार्वजनिक न्यासाचे नाव- प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी, ता.अलिबाग, जि. रायगड.
न्यास नोंदणी क्रमांक एफ-३३७३ (रायगड)
सौ.चित्रलेखा नृपाल पाटील — अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

३. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचे आहे काय?
अ) स्थावर मिळकत (वर्णन)

| अ. क्र. | गांव/ मौजे | भूमापन क्र. | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे भिलवले ता.खालापुर, जि.रायगड | ५४ अ ५अ | १०.०९.०० | ९.२४ |
| २ | | ५४ अ ५ब | ००.२६.०० | ०.५० |
| ३ | | ५४ अ ५क | ००.४३.०० | १.०० |
| ४ | | ५४ अ ५ड | ००.२६.०० | ०.५० |
| ५ | | ५४ अ ५ई | ००.२६.०० | ०.५० |

चर्तु सिमा-
पूर्व-मौजे वावंढळची शिव
पश्चिम - स.नं.५२ व ५५ ची मिळकत
दक्षिण स.नं.४९ व ५४/३ व ५४/४ ची मिळकत
उत्तरेस स.नं.५३ ची मिळकत

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा लेखी देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियात ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज १०/०७/२०२५ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग, रायगड**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that under instructions of my Client, I am investigating the title of:-

(i) Mr. Vishwanath Gajanan Naik, (ii) Mr. Shashikant Gajanan Naik, (iii) Mr. Suresh Gajanan Naik, (iv) Mr. Parshuram Gajanan Naik, (v) Mr. Dattatray Gajanan Naik, (vi) Mr. Bhalchandra Gajanan Naik, (vii) Mr. Milind Gajanan Naik, (viii) Late Smt. Prabhawati Dattatray Mhatre Through Legal Heirs (a) Mr. Shailesh Dattaram Mhatre, (b) Smt. Shweta Sudhir Gurav and (c) Smt. Bhagyashree Bhaskar Naik, (ix) Smt. Madhuri Moreshwar Patil, (x) Smt. Alka Sanjay Gharat, (xi) Mr. Sunny Sanjay Gharat, (xii) Mr. Pranesh Sanjay Gharat, (xiii) Mr. Ranjit Gopinath Gharat and (xiv) Mr. Nitin Gopinath Gharat, all adult, having residence at Village Saral, Taluka Alibag, District Raigad, having a joint interest to the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property"), free from all encumbrances and claims.

All person(s), claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, bequest, succession, easement, order/decree/judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address, within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their alleged rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the First Property)**

All that piece and parcel of the agricultural land bearing Bhumapan Kramank/Upavibhag / Gat No. 287 admeasuring about 00.52.50 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab admeasuring 00.05.50 Akak H.R.Sq. Mtrs.), Assessing at Rs. 12.25 Ps., being, lying and situate at Village Saral, Taluka Alibag, District Raigad.

Alibag
Date : 10.7.2025

Sd/-
**Mr. S. Y. Bartake**
Advocate
B/202, Kuberaskshe C.H.S.,
Near Maruti Naka, Alibag,
Raigad - 402 201.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकती त्यांचे मालक १) श्रीम.निर्मला सिताराम बालदे २) श्री.विलास सिताराम डालदे ३) श्री.सुहास सिताराम बालदे ४) श्री.महेश सिताराम बालदे सर्व रा.२०७ दुसरा मजला, साईकृपा बिल्डिंग, दातीवली रोड, टाटा पॉवर जवळ, आनंद नगर, दिवा पुर्व, जि. ठाणे ४००६१२ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतींचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे - अवसरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ४ | ५/अ | ०-१६-०० | ०-०९ |
| ४ | ५/ब | ०-२३-०० | ०-१६ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ११/०७/२०२५

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को.ऑप.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८५०८००८१३

# निवडक



## सेंट जोसेफ शाळेचा रस्ता हरवला

**पाताळगंगा :** पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था होणे हे नित्याचे समिकरण होत चालले आहे. त्यातच लोधीवली, मार्गी वयाल या गावात जाणारा रस्ता पुर्णपणे चिखलामध्ये हरवला की काय, असा प्रश्न सध्या ग्रामस्थांना पडत आहे. त्याच ठिकाणी सेंट जोसेफ शाळा असून विद्यार्थ्यांना येथे येण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.हा रस्ता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या अंतर्गत येत असून, या ठिकाणी वाहने चिखलात अडकून सातत्याने अपघात घडत आहेत. तालुक्यात चांगले रस्ते होण्यासाठी खूप वेळ लागतो. मात्र, तेच रस्ते खोदकाम करण्यासाठी वेळ लागत नाही. त्यामुळे रस्त्यांची अक्षरक्षः चालण झाल्याचे अनेक ठिकाणी पहावयांस मिळत आहे. मात्र, असे असले तरी हा रस्ता केव्हा उत्तम होणार याकडे लक्ष लागले आहे.तोपर्यंत चिखलातून मार्ग काढावे लागणार, असे चित्र या ठिकाणी पहावयास मिळत आहे.



## पालीतील खड्ड्यांची समस्या गंभीर

**सुधागड-पाली :** पाली नगरपंचायतीकडून काही दिवसांपूर्वी शहरातील रस्त्यांवर खड्डे भरण्याचे काम करण्यात आले होते. मात्र, काही काळाच्या विश्रांतीनंतर हेच खड्डे पुन्हा शहराच्या रस्त्यांवर उघडपणे दिसू लागले आहेत, त्यामुळे नागरिक आणि वाहनचालकांचा संताप वाढला आहे. पाली शहरातील गणपती मंदिराकडे जाणारा रस्ता, हटाळेश्वर चौक, सुख सागर सोसायटीसमोर आणि अन्य अनेक ठिकाणी रस्त्यांना मोठे खड्डे पडले आहेत. विशेषतः सुख सागर सोसायटीसमोरील खड्डा इतका खोल व मोठा आहे की, वाहने अक्षरशः त्यात आपटत आहेत. त्यामुळे गंभीर अपघातांची शक्यता वाढली आहे. पाली शहरवासीय आणि वाहनचालकांकडून नगरपंचायतीकडून ठोस व शाश्वत उपाययोजना करण्याची तीव्र मागणी करण्यात येत आहे. फक्त तात्पुरत्या ठिगळाने नव्हे तर गुणवत्ता आणि दीर्घकालीन दृष्टीने रस्त्यांची दुरुस्ती व्हावी, असा आग्रह नागरिकांनी धरला आहे.



## ग्रामीण रुग्णालय सर्वसामान्यांसाठी वरदान

**रसायनी :** चौक बाजारपेठ, सभोवतालच्या वाड्या-वस्त्या व आजूबाजूच्या गावांसाठी खालापूर तालुक्यातील एकमेव असलेले ग्रामीण रुग्णालय चौक हे त्यांच्यासाठी वरदान ठरत आहे. ग्रामीण रुग्णालय चौक येथील वैद्यकीय अधिक्षक डॉ. सविता काळेल यांनी पदभार स्विकारल्यापासून चौक ग्रामीण रुग्णालयाचा कायापालट झाल्याचे दिसून येत आहे. मोहोपाडा रसायनीसह तालुक्यातील अनेक रुग्णांना विविध प्रकारच्या सेवांचा लाभ मिळाला आहे. रुग्णालयात डॉक्टर्स, नर्स, दंत चिकित्सक आणि इतर कर्मचारी यांच्या उपलब्धतेमुळे रुग्ण संख्यांची उपचारासाठी प्रचंड वाढ दिसून येत आहे. बाह्यरुग्ण विभागात दिवसाला किमान २०० रुग्ण सेवेचा लाभ घेतात. तसेच, ज्या रुग्णांना रुग्णालयात भरतीची आवश्यकता असते अशांना रुग्णालयात भरती करून पुढील उपचार दिले जातात. त्यांचीही संख्या महिन्याला सरासरी ५०० असते.

# सातघरमधील वहिवाटीचा रस्ता बंद

## पेढांबेच्या सरपंचाच्या मुलाची दादागिरी





कृषीवल हेरगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सातघर येथील असंख्य ग्रामस्थांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. गावालगत गट नं. ४७ मधून वाहणारा ओढा आहे. ओढ्याच्या बाजूलाच असंख्य शेतकऱ्यांची शेतजमीन आहे. ओढ्याच्या जागेमधून पुर्वापार शेतावर जाण्याच्या पायवाटेचा रस्ता आह. या जागेशी पेढांबेच्या सरपंचांचे सुपूत्र रोहित पाटील तसेच पती रविंद्र पाटील यांचा काहीही संबंध नाही. तरीदेखील या वहिवाटीच्या जागेत भराव टाकून सिमेंट काँक्रीटचे बांधकाम केले आहे. रात्रीच्यावेळी हा प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पावसाळ्यात बांधकामामुळे पावसाचे पाणी या ओढ्यात मोठ्या प्रमाणात साचत आहे. त्यामुळे पाण्याचा प्रवाह वाढून शेताकडे जाण्याचा अडथळा निर्माण झाला आहे. या बेकायदेशीर बांधकामामुळे नांगर, व इतर शेती अवजारांची शेतावर ने-आण करताना अडचणी निर्माण होत आहेत. तसेच, डोंगर भागातून येणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे शेत जमीनींना धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. शेतावर जाण्याचा मार्गच बंद झाल्याचा फटका देखील शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळे रोहित पाटील व रविंद्र पाटील यांच्याविरोधात कारवाई करून बेकायदेशीर बांधकाम तोडण्यात यावे, अशी मागणी सातघर ग्रामस्थांनी केली आहे. त्याबाबत अलिबाग तहसील कार्यालयासह पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. तक्रारकरून एक महिना होत आला आहे. तरीदेखील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

### तक्रार अर्ज गहाळ झाल्याचा आरोप

**पेढांब्याच्या सरपंच यांच्या सुपूत्राने वहिवाटीचा रस्ता बंद करून शेतकरी, ग्रामस्थांचे प्रचंड नुकसान केले आहे. याविरोधात न्याय मिळण्यासाठी अलिबाग तहसील कार्यालयात अर्ज करण्यात आला. परंतु तक्रार अर्जच तहसील कार्यालयाकडून गहाळ झाल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. त्यामुळे अर्ज गहाळ होण्यामागे नक्की कारण काय असा प्रश्न उपस्थित होत असून तहसील कार्यालयाच्या या कारभाराबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.**

### अलिबागच्या तहसीलदारांचे तक्रारीकडे दुर्लक्ष

**सातघर गावापासून काही अंतरावर अनेक शेतकऱ्यांच्या जमीनी आहेत. गावालगत असलेल्या पुर्वपरंपरागत नाल्याच्या बाजूनेच शेतावर जाण्या-येण्याचा मार्ग आहे. मात्र, रोहित पाटील यांनी या ठिकाणी बेकायदेशीररित्या बांधकाम व भराव करून वहिवाटीचा रस्ताच बंद केला आहे. त्याबाबत अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांच्याकडे ग्रामस्थांनी तक्रार अर्ज केला. तलाठी, सर्कल यांना पाठवून कार्यवाही करणार, असे आश्वासनही दिले. मात्र, गेल्या अनेकदिवसांपासून कोणीही सरकारी कर्मचारी या जागेवर फिरकला नाही. अलिबागच्या तहसीलदारांचे तक्रारीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.**

### रोहित पाटीलचा मनमानी कारभार

**पेंढाबे ग्रामपंचायतीच्या सरपंचांचे चिरंजीव रोहित पाटील यांनी पंधरा दिवसांपुर्वी एका व्यावसायिकांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर गाडी उभी करून रस्ता अडवला होता. याप्रकरणी रोहित पाटील यांच्या विरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती. आपल्या आईच्या सरपंचपदाचा गैरफायदा घेत रोहित पाटील ठिकठिकाणी दादागिरी करीत असल्याची चर्चा आहे. तंटामुक्ती अध्यक्षपद त्यांच्यात घरात असतानाही तंटामुक्त करण्याऐवजी तंटा वाढविण्यास रोहित भर देत असल्याचे तेथील स्थानिकांकडून सांगण्यात आले आहे. रोहित पाटील याच्या मनमानी कारभाराबाबत तीव्र संताप ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.**

> **पावसाळ्यामध्ये जो पारंपारिक ओढा वाहतो तो रोहित पाटील यांनी बंद केला आहे. या ओढ्यात डोंगरभागातील तिन्ही बाजूने पाहणी येते. त्यामुळे या आढ्याला नदीचे स्वरुप प्राप्त होते. या ओढ्याची रुंदी बांधकाम करून कमी केली आहे. त्यामुळे पुराचे पाणी आजूबाजूच्या शेतामध्ये जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच, जाण्या-येण्याची मोठी गैरसोय होत आहे. ही मिळकत हर्षल पाटील (राम पाटील) यांच्या मालकीची आहे. सातघर ग्रामस्थांच्या वहिवासाठी अनेक वर्षे त्यांनी ही जागा ठेवली आहे. रोहित पाटील यांनी त्यांच्या मिळकतीमध्ये जाण्यासाठी ओढ्याच्या ठिकाणी बांधकाम करून नुकसान केले आहे.**
>
> **- दिपक पाटील, अठरा गाव समिती अध्यक्ष**

> **सातघरमधील वहिवाटीचा रस्ता बंद केल्याची माहिती येथील ग्रामस्थ दिपक पाटील यांच्याकडून प्राप्त झाली. सबंधितांना पत्र देऊन सोमवारी अथवा मंगळवारी जागेवर जाऊन पाहणी करून अहवाल तयार करून वरिष्ठांकडे पाठविला जाईल.**
>
> **- रिना म्हात्रे, तलाठी**

> **सातघर गावाजवळ असलेल्या नाल्याजवळूनच शेताकडे जाण्याचा रस्ता आहे. हा वहिवाटीचा रस्ता पुर्वपरंपरागत आहे. मात्र, हा रस्ताच रोहित पाटील यांनी दादागिरी करून बंद केला आहे. अनधिकृतरित्या बांधकाम, भराव टाकून वहिवाटीचा रस्ता बंद केल्याचा फटका शेतकरी, ग्रामस्थांना बसला आहे. शेतावर जाण्यास अडथळे निर्माण होत आहे. शेतीची अवजारेदेखील येथून नेता येत नाही. याबाबत तहसीलदारांसह पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. परंतु, अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही.**
>
> **- प्रकाश पाटील, ग्रामस्थ व पंच**

# सडक योजनेतून रस्ता बनविण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावाला पर्यायी मार्ग म्हणून महत्वाचा ठरू शकणाऱ्या माणगाव ते दामत फाटा या मार्गाचे काँक्रीटीकरण राज्य सरकारने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन मानवाधिकार संस्थेने दिले आहे. या पेशवे काळातील रस्त्याच्या मजबुतीकरणाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने आज हा पर्यायी मार्ग वाहनांसाठी बंद होण्याच्या मार्गवर आहे.



आंबिवली रेल्वे गेट ते दामत रेल्वे गेट पेशवाई मार्गावरील रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता हे कळायला मार्ग नाही. दरम्यान, या रस्त्यावर आतापर्यंत अनेक छोटे-मोठे अपघात घडले असून काहींना आपला प्राण देखील गमवावा लागलेला आहेत. तसेच, रात्री या रस्त्यावरून प्रवास करणे धोक्याचे बनल्याने या रस्त्याचा वापर गुन्हेगारी प्रवृत्तीचे चोर करू लागल्याचे समोर आले होते. हा जोड रस्ता अनेक गावांना जोडणारा असून महत्वाचा दुवा मानला जात असताना देखील रस्त्यावर शासनाचे दुर्लक्ष का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

या रस्त्याबाबत अधिकारी वर्गाला सूचना केल्यानंतर देखील रस्त्याचे काम केले जात नाही. कर्जत आणि कल्याण, कशेळे राज्य मार्ग तसेच माथेरान कळंब राज्य मार्ग यांच्यासाठी पर्यायी सम ाजाला जाणाऱ्या या रस्त्यामुळे नेरळ गावातील सर्व वाहतूक आटोक्यात येऊ शकते. त्यामुळे शासनाने या रस्त्याची गरज लक्षात घेऊन मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ता बनवावा, अशी मागणी केली आहे.

# 'कृषीवल'च्या दणक्याने स्लॅग रातोरात उचलली





एमएसआरडीसीचा अजब कारभार
थातुरमातुर डागडुजी जीवावर बेतण्याची शक्यता
रस्त्यावरील खड्डे 'स्लॅग'ने भरण्याचा 'जावईशोध'

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवदंडा मार्गावर कुरूळ येथे पडलेल्या खड्ड्यांच्या डागडुजीसाठी जेएसडब्ल्यूकडून बाहेर टाकण्यात येणाऱ्या स्लॅगचा वापर एमएसआरडीसीकडून करण्यात आला होता. परंतु, त्यामुळे येथे धोकादायक स्तिथी निर्माण झाली होती. त्याविरोधात 'कृषीवल'ने आवाज उठवत गुरूवारी (दि.१०) ''रसत्यावरील खड्डे 'स्लॅग'ने भरण्याचा 'जावईशोध'' या मथळ्याखाली बातमी प्रकाशित करताच रातोरात येथील स्लॅग उचलण्यात आले. त्यामुळे जनतेचा आवाज बनून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या 'कृषीवल'चे सर्व स्तरातून आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

अलिबाग-रेवदंडा रस्त्यावरील खड्डे रेडिमिक्स डांबराच्या साहाय्याने बुजवणे गरजेचे असताना स्लॅगचा वापर करून खड्डे बुजवण्याचा अजब प्रकार एमएसआरडीसीने केला होता. त्यामुळे या ठिकाणी दुचाकी स्वरांना गाडी चालवणे कठीण झाले होते. अनेक दुचाकी स्लिप देखील झाल्या. याविरोधात जनतेतून संताप व्यक्त होत होता. दरम्यान, 'कृषीवल'ने जनतेचे प्रश्न लावून धरत या अजब कारभाराबाबत प्रशासनाला जाब विचारला. त्याची तात्काळ दखल घेत रस्त्यावरील स्लॅग रातोरात उचलण्यात आली. त्याबाबत 'कृषीवल'चे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# बंटी, बबलीला ठोकल्या बेड्या

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहर पोलीसांनी बॉलीवुड चित्रपटासारखे बंटी आणि बबलीला बेड्या ठोकल्या आहेत. तसेच, त्यांच्याकडून चार फसवणुकीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

पियुष भोसले नावाच्या व्यक्तीने सोनार व्यावसायिक सुनिल बडगुजर यांना स्वस्त दरात सोने देतो, असे आमीष दाखविले. त्या बदल्यात रोखीने १० लाख रुपये मंदिपकौर हीला देण्यास सांगितले. त्यानुसार सुनिल बडगुजर यांनी त्यांना रक्कम दिल्यानंतर पियुष भोसले व त्याची सहकारी महिला मंदिपकौर हे दोन्ही आरोपी पसार झाले होते. सुनील बडगुजर यांना त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीसांनी माहिती काढल्यानंतर एप्रिल मध्येच मंदिपकौर ही सापडली. तेव्हा तिला नोटीस देऊन सोडण्यात आले. मात्र, तिने पियुष भोसले याला पोलीस आपला शोध घेत असल्याचे सांगितले आणि दोघेही पनवेल मधून फरार झाले. त्यांनतर त्यांचा अधिक तपास केल्यानंतर ते डोंबिवली येथील प्रतिष्ठीत सोसायटी लोढा पलावा येथे राहत असल्याची माहिती मिळाली. मानपाडा पोलीस ठाण्याच्या मदतीने दोन्ही आरोपींचा त्या ठिकाणी जाऊन शोध घेतल्यानंतर दोन्ही आरोपी सापडले आणि त्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या अधिक तपासात दोन्ही आरोपींचा पनवेल शहर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा, तर पियुषचा पनवेल शहर पोलीस ठाण्यात एन.एम.एम.टी कर्मचारीस मारहाण प्रकरणी आणि सीबीडी, बेलापुर पोलीस ठाण्यात फसवणुकीच्या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# २२ लाखांची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

घोट येथील ५९ वर्षीय महिलेला आरती यांनी कोटक क्यू आयबीएची लिंक पाठवली. रजिस्ट्रेशन करण्यात आले. सुरुवातीला त्यांनी ५ हजार रुपये गुंतवले. त्यात त्यांना फायदा झाला. त्यामुळे त्यांनी आणखी गुंतवणूक केली. परंतु, जोपर्यंत आणखी पैसे भरत नाही तोपर्यंत पैसे काढता येणार नाही, असे सांगितले गेले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

वाहतूक कोंडीवर प्रभावी उपाय | दोन बहुमजली वाहनस्थळ निर्मिती

# पनवेल महानगरपालिकेचे बहुद्देशीय प्रकल्प

**। पनवेल । वार्ताहर ।**

अतिशय वेगाने विकसित होत असलेले पनवेल शहर हे बाजारपेठेसाठी सुप्रसिद्ध असे आहे. आसपासच्या परिसरातील नागरिक पनवेल मध्ये खरेदीसाठी येत असतात. परंतु, पार्किंगची समस्या असल्यामुळे या ठिकाणी वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण होते. ही वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने दोन बहुमजली वाहनस्थळ निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी बहुउद्देशीय प्रकल्प हाती घेतला आहे.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या पुढील बाजूस व प्रभाग कार्यालय 'ड' इमारतीच्या बाजूस हे दोन बहुमजली पार्किंग स्थळ उभारण्यात येत आहेत. २३ हजार ७३७ चौरस मीटर क्षेत्रफळ असणारे १० व १२ मजली पार्किंग संकुल बांधण्यात येत आहे. काम सुरू झाल्यापासून २ वर्षांत हे प्रकल्प पूर्ण होतील, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिली आहे.



सुमारे ७० कोटी ८५ लाख ५६ हजार ५६१ रुपये खर्चाचे हे १० मजली संकुल असणार आहे. तळघर एकमध्ये २०७ दुचाकी, तळघर दोनमध्ये २९ चारचाकी, तळमजला १२ व्यावसायिक दुकाने, पहिला मजला १८ व्यावसायिक दुकाने, दुसरा ते सहावा मजला प्रति मजला २८ चारचाकी प्रमाणे १४० चारचाकी वाहने, तसेच सातवा मजला २६ चारचाकी वाहन पार्किंग क्षमता असणार आहे. आठव्या व नवव्या मजल्यावर सभागृह असून त्याची आसनक्षमता २८२ आहे. याखेरीस दहाव्या मजल्यावर बहुउद्देशीय सभागृह ज्याची आसनक्षमता ५०० अशी आहे. तर, बारामजली संकुलात तळघर क्रमांक एकमध्ये १२१ दुचाकी वाहन, तळघर क्रमांक दोनमध्ये १४२ दुचाकी वाहन, तळमजला व पहिला मजल्यावर अनुक्रमे ५९ व ५६ व्यावसायिक दुकाने, ८ ऑफिससाठी जागा, तिसरा ते बारावा मजला यामध्ये प्रति मजला ४ दुचाकी व १५ चार चाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था, याखेरीज मोठे भव्य टेरेस असणार आहे.

### आर्थिक बळकटीकरण

**साधारणतः १२१ कोटींचे हे प्रकल्प आहेत. या दोन्ही वाहन संकुलामध्ये ५१० दुचाकी तर ३४५ चारचाकी वाहनांची पार्किंग सुविधा उपलब्ध असेल. त्याचप्रमाणे या ठिकाणी वाहनांच्या चार्जिंगची व्यवस्था सुद्धा करण्यात येईल. शिवाय वाहन धुण्यासाठी वॉशिंग सेंटर, संकुलातील व्यापाऱ्यांसाठी राखीव वाहन पार्किंग असेल. तसेच, परिसरातील नागरिकांना आपले वाहने या ठिकाणी ठेवायची असल्यास त्यांना देखील मासिक व वार्षिक भाडेतत्त्वावर वाहन पार्किंगसाठी जागा उपलब्ध असेल. नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांसोबतच महानगरपालिकेचे आर्थिक बळकटीकरण देखील यातून होऊ शकते.**



# गुजरात मॉडेलचा फज्जा

नरेंद्र मोदींच्या तथाकथित गुजरात मॉडेलचा कसा फज्जा उडाला आहे हे बडोद्यातील पूल दुर्घटनेवरून दिसून येते. गुजरात म्हणजे भारतातला जणू स्वर्गच, गुजरात म्हणजे चोख कारभार अशा प्रकारचे चित्र नरेंद्र मोदी आणि त्यांचे समर्थक उभे करीत असतात. प्रत्यक्षात गुजरात हे भारतातल्या इतर कोणत्याही राज्याइतकेच भ्रष्ट, अकार्यक्षम व मागास राज्य आहे. इथे इतर राज्यांपेक्षा चार कारखाने अधिक असतील, रस्ते थोडे बरे असतील पण एकूण प्रगती आणि कारभार पोकळच आहे हे या अशा अपघातांमुळे वारंवार दिसले आहे. बडोदा आणि आणंद या जिल्ह्यांना जोडणारा माही नदीवरचा हा पूल बुधवारी कोसळला व याची माहिती नसल्याने अनेक गाड्या खाली नदीत पडल्या. सुदैवाने नदीला फार पाणी नसल्याने अधिक हानी झाली नाही. हा पूल खराब झालेला असून गाड्या त्यावरून जातात तेव्हा तो गदागदा हलतो अशी तक्रार बडोदा जिल्हा परिषदेच्या सदस्याने सरकारकडे केलेली होती. त्याची चौकशी व्हावी यासाठी सरकारच्या रस्ते दुरुस्ती खात्यात पत्रापत्रीही झाली होती. पण प्रत्यक्ष कार्यवाही मात्र झाली नव्हती. हा पूल ४३ वर्षांपूर्वी काँग्रेसच्या राज्यात बांधलेला असला तरी त्याची दुरुस्ती करणे ही भाजप सरकारची जबाबदारी आहे. गेली २७ वर्षे गुजरातेत भाजपचे राज्य आहे. त्यातील अकरा वर्षे तर खुद्द नरेंद्र मोदीच मुख्यमंत्री राहिलेले आहेत. मोठमोठ्या उद्योगपतींना बोलावून इव्हेंट केले, बडेजाव केला आणि स्वतः च्या पाळलेल्या मिडियातून प्रसिध्दी करून घेतली तरीही शेवटी वास्तव उघडे पडतेच. ते या पुलाच्या निमित्ताने समोर आले आहे. यापूर्वी ऑक्टोबर २०२२ मध्ये मोरबी इथे एक झुलता पूल कोसळून १४१ लोक हकनाक प्राणाला मुकले होते. हा पूल ब्रिटिशांच्या काळात १८८० मध्ये बांधण्यात आला होता. इतकी वर्षे तो मजबूत होता. पण मोदी सरकारच्या काळात मात्र त्याची वाट लागली. अंजता म्हणजेच ओरेवा या घड्याळ कंपनीने त्या पुलाच्या देखरेखीची जबाबदारी घेतली होती. पण ती नीट पार पाडली नाही.

### मोरबी पुलाची आठवण

लोखंडी दोर व खांबांच्या आधारे हा पूल उभा होता. पण हे सर्व गंजलेले होते. ते बदलण्याची गरज होती. पण ते न करताच पूल नवा झाला अशी जाहिरात करून तो लोकांना खुला करण्यात आला. या झुलत्या पुलावर लोकांनी गर्दी केली. १२५ ची क्षमता असताना ५०० लोक अपघात घडला तेव्हा पुलावर होते. त्यांना रोखण्यात आले नाही. परिणामी पूल पडला. ओरेवा कंपनीच्या मालकाला बराच काळ अटक झालेली नव्हती. आता खटला चालू असला तरी कंपनीला कोणतीही शिक्षा झालेली नाही. आता माही नदीवरील पुलाच्या बाबतीतही हाच चौकशीचा फार्स पुन्हा एकदा होण्याची शक्यता आहे. अदानी आणि अंबानीला मोकाट जमिनी, पैसा आणि उद्योगांचे परवाने देणे म्हणजे विकास अशी मोदी आणि भाजपची कल्पना झालेली आहे. खाली प्रशासन कसे चालू आहे, लोकांचे प्रश्न सुटले आहेत का याची त्यांना पर्वा नाही. एकूणच गुजरातेतील बांधकामांचा दर्जा भयंकर वाईट दिसतो. २०२३ मध्ये पालनपूर इथे बांधकाम सुरू असलेला एक पूल कोसळून तीन जण मरण पावले होते. हा पूल नितीन गडकरींच्या केंद्रीय खात्याच्या अखत्यारीतील होता. काही वर्षांपूर्वी आलेल्या भूकंपात अहमदाबादेत इमारती प्रचंड संख्येने कोसळल्या होत्या. त्याला मुख्यतः खराब व अंदाधुंद बांधकामे कारणीभूत होती. अलिकडेच अहमदाबादला एअर इंडियाचे विमान कोसळून अडीचशे लोक मेले. अपघात विमानातील बिघाडामुळे झाला असला तरी त्या निमित्ताने अहमदाबाद विमानतळाजवळील बेछूट बांधकामांचीही चर्चा झाली. तेथे एक जुने मच्छी मार्केट आहे. त्यामुळे तेथे हवेत बऱ्याच घारी व इतर पक्षी उडत राहतात व त्यांच्यापासून विमानाला धोका निर्माण होतो. सबब हे मार्केट इतरत्र हलवावे असे विमानतळाच्या अधिकाऱ्यांनी अहमदाबाद पालिकेला सांगून झाले आहे. पण भाजपच्या ताब्यात असलेल्या या पालिकेतील नगरसेवकांनी हे होऊ दिलेले नाही. या सगळ्यांचे ऑडिट करायला हवे. हिंदुत्वाने भारलेले भाजपचे लोक असले तरी इतर कोणाही इतकेच, किंबहुना जास्तच भ्रष्ट असतात व देशाशी व लोकांशी गद्दारी करू शकतात हे या निमित्ताने समोर यायला हवे.

### भ्रष्ट आणि अकार्यक्षम

याच गुजरातच्या अदानीच्या मालकीच्या बंदरांमधून मागे हजारो कोटींचे अमली पदार्थ जप्त झाले होते. यांची वाहतूक नियमितपणे होत असावी असा संशय व्यक्त झाला होता. मात्र त्याविषयी म्हणावी तशी कारवाई झाली नव्हती. गुजरातचा समुद्रकिनारा महाराष्ट्रापेक्षाही मोठा आहे. पण तो केरळ, गोवा किंवा महाराष्ट्राप्रमाणे तेथे पर्यटक जात नाहीत. कारण, गुजरातेतील कारखान्यांमुळे सर्वत्र भयंकर प्रदूषण झाले आहे. किनारपट्टीची वाट लागली आहे. प्रत्येक गोष्टीचा धंदा आणि हरेक गोष्टीतून पैसा काढायच्या प्रवृत्तीमुळे हा ऱ्हास झाला आहे. गुजरात मॉडेलच्या नावाने सर्वांना उल्लू बनवले जात आहे. एकूणच देशात विकासाच्या नावाने वाटेल तशी बांधकामे केली जात असून त्यांच्या दर्जाकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. गेल्या पाच वर्षांमध्ये देशात ४२ छोटे व मोठे पूल कोसळले आहेत. २०२१ ते २०२४ या तीन वर्षांमध्ये रस्ते वाहतूक खात्यांतर्गत येणारे २१ पूल पडले आहेत. यातले १५ काम पूर्ण झालेले व सहा बांधकाम चालू असलेले होते. काल कोसळेला माही नदीवरचा पूल सुमारे ९०० मीटर लांबीचा व २३ खांबांवर उभारलेला होता. अलिकडे असे पूल एकसंधपणे न बांधता, त्यांचे विविध भाग दुसरीकडे तयार केले जाऊन नंतर हा रस्ता एकत्र जोडला जातो. आता यातला हा एक भाग का कमकुवत राहिला याची चौकशी करावी लागेल. मात्र मोदींच्या गुजरात मॉडेलचे हे चांगले प्रतीक म्हणावे लागेल. पन्नास ठिकाणाहून सुट्टे भाग जुळवून आणायचे, त्यांच्या दर्जाची कसलीही खातरजमा करायची नाही, त्यांच्या देखभालीबाबत बेफिकिरी करायची, मात्र आमच्याकडे इतके पूल आणि रस्ते आहेत म्हणून गमजा मारायच्या असे हे मॉडेल आहे. हेच मोदी सरकार उत्तराखंड, हिमाचल, अरुणाचल इत्यादी प्रदेशामध्ये हिमालयाच्या नाजूक डोंगररांगा खोदून बेछूटपणे रस्ते, पूल, भुयारी मार्ग, धरणे इत्यादी बांधत आहे. गुजरातमधील घटना पाहता, देशात इतरत्र तरी सुरक्षेची पुरेशी काळजी घेतली जात आहे काय याबाबत कोणाच्याही मनात शंका निर्माण होणे साहजिक आहे. आपले अभियंते व चांगले अधिकारी यांच्या कर्तबगारीविषयी प्रश्न निर्माण करण्याचे कारण नाही. पण जिथे-तिथे मोदींच्या राजकारणाची कीड आणि प्रसिद्धीचा हव्यास यामुळे ही कर्तबगारी एका क्षणात मातीमोल होऊ शकते हेच गुजरातच्या उदाहरणावरून दिसते.

## विचार

# फेक व्हिडिओंची जटिल समस्या

***समाजमाध्यमांमार्फत 'व्हायरल' झालेल्या फोटो किंवा व्हीडिओवरून गैरसमज होऊन भांडणे, हिंसाचार, न्यायालयीन प्रकरणे किंवा दंगली उद्भवणे आता नवीन राहिलेले नाही. सध्या काय सांगितले आहे यापेक्षा कोणी सांगितले आहे याला महत्त्व आले आहे. 'फेक' घटनांची खात्री करण्याची सुविधा देणारी अनेक ॲप्स न वापरता लोक चुकीचे कृत्य करून मोकळे होतात. एक जटील समस्या बनत असलेल्या या 'फेक' दुनियेचा वेध.***



**डॉ. दीपक शिकारपूर**

सोशल मीडियाचा वापर जगभर वाढू लागल्यावर त्यामध्ये काही समाजविघातक बाबी शिरणे अपरिहार्यच होते. सायबर गुन्हेगार इथेही सक्रिय झालेच. स्वतःचे खोटे प्रोफाइल ठेवून नोकरी, विवाह, प्रवास, व्यापार किंवा मैत्रीच्याही निमित्ताने लोकांना जाळ्यात ओढणे आणि पैशांना किंवा वैयक्तिक पातळीवरील इतर गोष्टींमध्ये ठकवणे हादेखील एक मोठा व्यवसाय बनला असे म्हणावे लागेल. याचीच पुढील आवृत्ती म्हणजे फेक न्यूज. याला होक्स असेही नाव आहे. अशा बातम्या कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. राजकारण आणि अर्थकारणापासून 'आज पृथ्वीवर सूर्याकडून कॉस्मिक रेजचा मारा होणार आहे तरी सावध राहावे'पर्यंत यामध्ये काहीही असू शकते. अशा बातम्यांना मसाला व्हॅल्यू असल्याने सोशल मीडियावर त्या झपाट्याने पसरतात. याचीच पुढची पायरी म्हणजे फेक व्हिडिओ. समाजमाध्यमांमार्फत 'व्हायरल' झालेल्या फोटो किंवा व्हीडिओवरून गैरसमज होऊन भांडणे, हिंसाचार, कोर्ट केसेस आणि अगदी दंगली उद्भवणे आता नवीन राहिलेले नाही. आपण पाहिलेला फोटो किंवा व्हीडिओ अस्सल आहे की मॉर्फिंग केलेला म्हणजे संगणकीय साधने वापरून सोयीस्करीत्या कट-पेस्ट केलेला आहे, याची खात्री न करताच पाठिंबा किंवा विरोध करण्याच्या हालचाली सुरू केल्या जातात. पण सध्या काय सांगितले आहे यापेक्षा ते कोणी सांगितले, यालाच महत्त्व आलेय. हा बहुधा मानवी स्वभावच असावा, कारण 'फेक' की 'रिअल' याची खात्री करण्याची सुविधा फुकट देणारी अनेक ॲप हाताशी असतानाही आपण तसे न करता घातक आणि चुकीचे कृत्य करून मोकळे होतो. वर्णनावरून चित्र काढण्याचे जे कौशल्य आपल्यातील काहींम ध्ये असते; त्याचाच हा अधिक उच्च पातळीवरचा तांत्रिक आविष्कार आहे.

सोशल मीडिया, विविध ॲप्स, ओटीटी.. फार काय, टीव्हीवर दाखवली जाणारी दृश्ये किंवा प्रसंग त्यांच्या मूळ रूपात असतीलच याची कोणतीही खात्री प्रेक्षकांना मिळू शकणार नाही आणि हे घडायला पुढची पाच ते दहा वर्षे पुरेशी आहेत. पण येत्या काही दशकांमध्ये हा प्रकार वाढत जाण्याचीच शक्यता आहे, कारण असे व्हीडिओ बनवण्यातला आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सहभाग वेगाने वाढत असल्याने दाखवली जाणारी बाब खरी की खोटी हे ओळखणे जवळजवळ अशक्य बनणार आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष ट्रम्प यांना अटक होताना, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉ अश्रुधुरातून मार्ग काढताना दिसणारे प्रसंग पाहिल्याचे किंवा याबाबत वाचल्याचे आठवत नाही ना? नाहीच आठवणार, कारण असे काही घडलेलेच नाही. हे प्रसंग संगणकावर बनवलेले आहेत. कृत्रिम प्रज्ञेवर आधारित 'मिडजर्नी' नावाच्या सॉफ्टवेअरने. पुरवलेल्या मजकुरावरून हे सॉफ्टवेअर प्रतिमा तयार करू शकते आणि त्या प्रतिमा किती हुबेहूब आहेत असेच वाटत राहते.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान पुढील वीस वर्षांमध्ये जगाचे चित्रच बदलून टाकणार आहे. वैद्यकीय, शिक्षण, दूरसंचार आदी अनेक क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा प्रवेश झाला आहे. फेक व्हिडीओ किंवा डीपफेक व्हिडीओ हे कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेले व्हिडीओ असतात, ज्यात व्यक्तींचे चेहरे, आवाज किंवा हालचाली खोटेपणाने बदलल्या जातात. मनोरंजन, जाहिरात, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे, परंतु त्याचा गैरवापरदेखील होऊ शकतो. जनरेटिव्ह एआय टूल्स वापरकर्त्यांच्या प्रॉम्प्ट (यूजर इनपुट) नुसार माहितीचे पृथ:करण करून नवनिर्मिती करतात. त्यातून निर्माण होणारी बाब मानवनिर्मित नाही हे स्पष्ट करण्याचे बंधन नसल्याने त्याच्या सत्यतेवर सर्वांचा विश्वास बसू शकतो. एआय बनावट परंतु वास्तविक दिसणाऱ्या प्रतिमा आणि व्हिडिओंची निर्मिती करून चुकीची माहिती सर्वत्र प्रसारीत करू शकतात. यामागे प्रतिगामी, गुन्हेगारी, दहशतवादी अथवा व्यावसायिक स्पर्धक असू शकतात पण, ते पाठीमागे राहून शांतपणे अदृश्य राहू शकतात. त्यामुळे जनमताचा प्रभाव सहज शक्य आहे .

डीपफेक व्हिडीओ तयार करण्यासाठी वापरली जाणारी प्रमुख एआय टूल्स अलिकडे चर्चेत आहेत. यापैकी 'डीपफेसलॅब' हे एक ओपन-सोर्स टूल आहे. ते वापरकर्त्यांना व्हिडीओमधील चेहऱ्यांचे स्वॅप करण्याची सुविधा देते. हे टूल उच्च अचूकतेसाठी ओळखले जाते आणि व्यावसायिकांमध्ये लोकप्रिय आहे. यात रिअल-टाइम प्रिव्ह्यू आणि बॅच प्रोसेसिंगसारखी वैशिष्ट्ये आहेत. रिफेस हे असेच एक मोबाइल ॲप्लिकेशन आहे. ते वापरकर्त्यांना त्यांच्या चेहऱ्यांचे व्हिडीओ आणि जीआयएफमध्ये स्वॅप करण्याची सुविधा देते. यात रिअल-टाइम चेहरा स्वॅपिंगची क्षमता आहे आणि सोशल मीडियावर सहज शेअर करता येते. डीप ब्रेन हे एक एआय व्हिडीओ जनरेटर आहे जे टेक्स्ट-टू-व्हिडीओ, टेक्स्ट-टू-ऑडिओ आणि एआय अवतार तयार करण्याची सुविधा देते. यात ८०पेक्षा जास्त भाषांमध्ये व्हॉइसओव्हर तयार करण्याची क्षमता आहे. यामुळे व्हिडीओ निर्मिती वेगवान आणि कार्यक्षम होते. याखेरीज मेकफिल्म हे एक व्यावसायिक डीपफेक व्हिडीओ मेकर आहे. ते एथिकल कंटेंट निर्मितीसाठी डिझाइन केले आहे. यात चेहरा स्वॅपिंग, व्हॉइस जनरेशन, व्हिडीओ डाउनलोड आणि व्हिडीओ आउटपुट सारखी वैशिष्ट्ये आहेत.

ही ॲप्स वापरताना सुरक्षित आणि नैतिक वापरासाठी सूचना घेणे आवश्यक आहे. एखाद्याच्या चेहऱ्याचा किंवा आवाजाचा वापर करण्यापूर्वी त्यांची स्पष्ट परवानगी घेणे अपेक्षित असते. व्हिडीओंमध्ये वॉटरमार्क्स वापरून ते एआयनिर्मित असल्याचे स्पष्ट करणे अपेक्षित होते. केवळ मनोरंजन, शिक्षण किंवा संशोधनासाठीच या तंत्रज्ञानाचा वापर करावा. राजकीय, सामाजिक किंवा वैयक्तिक हानीसाठी या तंत्रज्ञानाचा वापर टाळावा. माहिती-तंत्रज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीने सारे जग जोडण्याची किमया केली खरी; परंतु त्याबरोबरच विघातक, विद्ध्वंसक वृत्तींनाही कमी जोखीम पत्करून जास्त दुष्परिणाम घडवण्याची क्षमता प्राप्त झाली. या प्रकाराला, खरे तर गैरप्रकाराला वेळीच आळा न घातल्यास अराजक घडू शकते. परिणामी, सत्य लपवणे, ते वेगळ्या रूपात दाखवणे किंवा स्वतःला सोयीचा असेल तेवढाच भाग सांगणेही अगदी सहजशक्य होईल. यामध्ये प्रगत राष्ट्रांमध्ये उहापोह होऊन जागृती झाली आह १ ऑगस्ट २०२४ रोजी, युरोपियन कृत्रिम बुद्धिमत्ता कायदा अंमलात आला. नवीन नियमांचा एक भाग म्हणून कायदा प्रतिबंधित अस्वीकार्य पद्धतींची यादी तयार करतो, ज्यामुळे धोका वाढतो. या प्रतिबंधाचा उद्देश लोकांच्या सुरक्षेसाठी अस्वीकार्ह्य पातळीचा धोका असलेल्या क्षेत्रावर किंवा अनाहूत भेदभाव करणाऱ्या प्रणालींवर आहे.

आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरु आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकास आणि वापरासाठी स्पष्ट धोरण तयार करणे आवश्यक आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करण्यासाठी एक स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करणे आवश्यक आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्य म्हणजे काय याची कायदेशीर व्याख्या करण्याची वेळ आली आहे. यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी खरेपणा तपासण्यासाठी काही वेबसाईट्स तयार करणे जरुरीचे आहे. तसेच सायबर कायदे बदलून त्यात फेक न्यूज, व्हिडिओचा प्रसार करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना जबर शिक्षा व्हायला हवी. हे सर्व प्रकार फक्त राजकीय अथवा देशांमधील स्पर्धेपुरतेच नाहीत. उद्योग विश्व यापासून अलिप्त राहू शकत नाही. उद्योग आपले उत्पादन लोकप्रिय आणि अधिक लाभदायी करण्यासाठी स्पर्धक उद्योगांबद्दल गैरसमज, फेक माहिती सोशल मीडियावर पसरवू शकतो. व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षणपद्धतीत, व्यवस्थापन उच्च शिक्षणात अंतर्भूत केलेच पाहिजे. नीतिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान ही बाब शालेय, महाविद्यालयीन शिक्षणात अंतर्भूत करायची हीच वेळ आहे .

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

## चर्चा आजची

# सागरी सुरक्षा आजही असुरक्षित

**सुयोग आंग्रे**

देशाची सागरी सीमावर्ती भागातील अलिबाग नजीकच्या ऐतिहासिक कोर्लई किल्ल्यापासून सुमारे २ ते ३ नॉटिकल मैल खोल समुद्रात संशयित बोट आढळली आहे. तट रक्षक दलाच्या रडार यंत्रणेने ही बोट पाकिस्तानी असल्याचे संकेत दिले आहेत. अरबी समुद्रात असणारी ही संशयित बोट नक्की कोणाची आहे याचा शहानिशा करण्यासाठी रायगड पोलीस यंत्रणा युद्धपातळीवर प्रयत्न करीत आहे. रात्रीच्या अंधारात ही संशयित बोट स्पष्ट दिसत नसलीतरी कोर्लई समुद्र किनाऱ्यावरून दूर अंतरावर एक प्रकाश उघडझाप करीत असल्याचे स्पष्ट दिसत होते. या संशयित बोटीपर्यंत पोहोचणे सुरक्षा यंत्रणांना रात्री उशिरापर्यंत शक्य झालेले नव्हते हे विशेष म्हणावे लागेल. सोसाट्याचा वारा, कोसळणारा पाऊस आणि खवळलेल्या समुद्राच्या लाटा आणि समुद्राला लागलेली ओहोटी यामुळे सुरक्षा यंत्रणा संशयित बोटीपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. यंत्रणा हतबल झाल्याचे पहावयास मिळाले. बोटीपर्यंत पोहचण्यासाठी सुरक्षा यंत्रणेला पहाटेची वाट पहावी लागली. अलिबाग तालुक्यातील थेरोंडा येथील जेट्टीवर ही संशयित बोट येऊन गेल्याचे जीपीएस यंत्रणेच्या सहाय्याने रडारने शोधले होते. तेंव्हा रविवारी दुपारी ३ वाजण्याचा सुमार होता. त्यानंतर केंद्रातील सुरक्षा यंत्रणांनी रायगड पोलीस प्रशासनाला कळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो संदेश पोहचण्यास तब्बल सहा तास लागले. संदेश मिळाल्यानंतर रायगड पोलिसांनी सतर्क होत बंदोबस्त कडेकोट केला होता. रात्री दिसणाऱ्या प्रकाशापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न रायगड पोलिसांनी केला होता. परंतु सोसाट्याचा वारा, पाऊस आणि अंधार यामुळे संशयित बोटीपर्यंत यंत्रणेला पोहचता आले नाही. दरम्यान रायगड पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार संशयित बोट दुपारी तीन वाजता थेरोंडा येथील जेट्टीवर आल्याचे लोकेशन सापडत आहे. परंतु अशी कोणतेही बोट थेरोंडा जेट्टीवर किंवा परिसरात आली नसल्याचे स्थानिकांनी पोलिसांना सांगितले. परंतु सुरक्षा यंत्रणेच्या रडारने ही संशयित बोट दाखल झाल्याचे लोकेशन शोधल्याने आता संशयित बोटीचे गुढ अधिक वाढले आहे. बोट आली होती. मग ती कितीवेळ जेट्टीवर थांबली. दुपारच्या वेळेत स्थानिकांच्या निदर्शनात ती बोट का आली नाही. आणि जर समुद्रात ती संशयित बोट असल्याचे संकेत मिळत असताना तटरक्षक दल आणि नौदल यांनी त्या बोटीचा तातडीने शोध का घेतला नाही असे अनेक गुलदस्त्यात असणारे प्रश्न उपस्थित होत आहेत. एकीकडे देशाच्या संरक्षण मंत्रालयाने ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून पाकिस्तानला गुडघ्यावर आणले आहे. यामुळे सीमावर्ती भागात युद्धाचे ढग दाटून आहेत. अशातच आता देशाची सागरी सीमा असणाऱ्या रायगड किनारपट्टीवरील अलिबाग आणि मुरुड तालुक्यांच्या मध्यावर असणाऱ्या कोर्लई किल्ला परिसरातील खोल समुद्रात संशयित बोट आढळली. आणि रायगडकरांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली आहे. भारताची सुरक्षा यंत्रणा अद्ययावत आहे. देशाच्या सीमेवरील परिसरात असणारे रडार सीमा ओलांडून येणाऱ्या पाखरांची देखील दखल घेते मग संशयित पाकिस्तानी बोट खोल समुद्रातून सुरक्षा यंत्रणांची नजर चुकवून रायगड जिल्ह्याच्या किनाऱ्यावर म्हणजेच कोर्लई किल्ल्याच्या परिसरात आल्यावर रडारच्या कचाट्यात सापडते. यंत्रणा बोट पाकिस्तानची असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करते. त्यानंतर अथक प्रयत्न करून संशयित बोटीपर्यंत पोहोचण्याची पोलिसांची धडपड आणि तळमळ वाखाणण्याजोगी होती परंतु बोटीपर्यंत पोहोचणे त्यांना शक्य झाले नाही. खोदा पहाड निकला चूहा या उक्तीप्रमाणे दोन दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर तटरक्षक दलाने ती संशयित बोट नसून तो बोया आहे. यावर शिकामोर्तब केले. पण अधिकृतपणे सांगणाऱ्या सुरक्षा यंत्रणांनी देशाच्या सीमावर्ती भागात दाखल झालेली ती वस्तू पाकिस्तानची आहे. हे सांगण्यास ते विसरले नाहीत. आता प्रश्न पडतो तो. असा कि जर ती बोट नव्हती आणि बॉय होता. मग या यंत्रणांनी तो पाकिस्तानी बोया शोधला का नाही. सुरक्षा यंत्रणांनी बोट नसल्याचे जाहीर केले असलेतरी बोया होता आणि तो पाकिस्तानी होता हे सांगताना सुरक्षा यंत्रणांना काहीच वाटले नसावे. आता पाकिस्तानच्या समुद्रातून कोर्लई पर्यंतचा या बोयाचा सागरी प्रवास निश्चितपणे खडतर झाला असणार कारण आता समुद्र खवळलेला आहे. पण भारताच्या सागरी सीमांकनामधून प्रवेश करून येणारा हा बोया शेकडो किलोमीटरचा सागरी नॉटिकल मैल प्रवास करून येताना सुरक्षा यंत्रणांच्या नजरेत आला नाही हे विशेष. असेपण रायगड जिल्ह्याचा सागरी किनारा सुरक्षित नाही हे अनेकदा सिद्ध झाले आहे. मग तो मुंबईतील बॉम्बस्फोट असो अथवा काही दिवसांपूर्वी किनाऱ्यावर सापडलेल्या अमली पदार्थांच्या पिशव्या असो. कोर्लई समुद्रात दिसलेली संशयास्पद बोट ही प्रत्यक्षात बोट नसून बोया असल्याचे स्पष्ट झाले आहे, अशी माहिती रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या जनसंपर्क विभागाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. त्यामुळे संशयित बोट प्रकरणावर रायगड पोलिसांनी पडदा टाकला. हा सर्व प्रकार गांभीर्याने घेण्यासारखाचहोता. कारण रायगड जिल्ह्याची किनारपट्टी असे आपण म्हणत असलो तरी ही किनारपट्टी म्हणजे देशाची सागरी सीमा आहे हे आपल्याला विसरून चालणार नाही.

## लोकसंसद

### जिवितसह मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी स्ट्रक्चरल ऑडिट गरजेचे

पावसाळा सुरू झाला की पूर, इमारती-दरडी कोसळणे, पूल वाहून जाणे, धरणे फुटणे, संरक्षक भिंती खचणे यासारख्या घटना दरवर्षी नियमित घडतात त्यामुळे अनेकांना प्राण गमवावा लागला आहे प्रशासन वेळोवेळी असल्या घटनांकडे डोळेझाक करते मात्र याचा फटका जनतेला बसतो त्यासाठी याचा गांभीर्याने विचार करुन जीवितहानी, वित्तहानी व मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या अशा घटना टाळण्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामांचे नियमित संरचनात्मक लेखापरीक्षण अर्थात स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक असते. माणूस चाळीस वर्षांचा झाला की साधारणत: डॉक्टर नियमित वैद्यकीय तपासणी करण्यास सुचवितात व सुदृढ राहण्यासाठी त्या आपण करीत असतो. त्याचप्रमाणे इमारतीचे वय ३० वर्षांवरील असेल तर दर तीन वर्षांनी संरचनात्मक लेखापरीक्षण करणे कायद्याने अनिवार्य आहे.संरचनात्मक लेखापरीक्षणात इमारतीचे विविध भाग जसे की, कॉलम, बिम, स्लॅब, भिंती, पाया इत्यादींची तपासणी तज्ज्ञांकडून करून इमारतीची गुणवत्ता, क्षमता व आयुष्यमान ठरविले जाते. बांधकामांतील भिंतीमध्ये निर्माण झालेल्या तडा, विविध भागांत निर्माण झालेला ओलावा, धरलेले पोपडे, काँक्रीटमधील सळ्यांना लागलेले गंज, विविध भागांत निर्माण झालेले बाक, विविध पाईपलाइनमधील गळती यावरून बांधकाम सुरक्षित आहे की नाही हे ठरवू शकतो. इमारतीप्रमाणे विविध स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामे जसे की धरण, पूल, उंच पाण्याच्या टाक्या, संरक्षक भिंती इत्यादींचे वेळोवेळी संरचनात्मक लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. महत्त्वाच्या स्थापत्य अभियांत्रिकी बांधकामांचे संरचनात्मक लेखापरीक्षण नियमित करून अहवालाप्रमाणे कार्यवाही केल्यास पावसाळ्यातील भविष्यातील बऱ्याच दुर्घटना तसेच मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी टाळणे शक्य होऊ शकते. याकरिता संबंधित शासकीय बांधकाम विभाग, महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यासारख्या विभागांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकामाचे संरचनात्मक लेखापरीक्षण बंधनकारक करून त्याची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

## दिनविशेष

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

११ जुलै हा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे.



आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही.

कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे. ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली. या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही. त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल.

देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वांनाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे. त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे.

लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**– श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड**

# भूमि अभिलेख कार्यालयाला टाळे

| उरण | वार्ताहर |

**उरण तालुक्यातील महसूल व वन विभागाचा लेखाजोखा मांडणारे भूमि अभिलेख कार्यालय शासकीय वेळेनुसार उघडले जात नसल्याने तसेच अनेक वेळा कार्यालयाला टाळे लागलेले असल्याने या कार्यालयात ये-जा करणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांना, शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामचुकारपणा करणाऱ्या उप अधिक्षकांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करत आहेत.**




भूमि अभिलेख कार्यालयाची मुख्य कामे जमिनीच्या नोंदी ठेवणे, जमिनीचे विभाजन करणे, आणि जमिनीच्या मालकीचे वाद मिटवण्यासाठी मदत करणे तसेच जमिनीचे सर्व्हे करणे, आकार फोड, जमिनीचा नकाशासह इतर जमिनी संबंधीत कामे आहेत.

उरण तालुक्यातील सर्व सामान्य नागरिक, शेतकरी हे दरदिवशी तालुक्यातील महसूल व वन विभागाच्या अखत्यारीत असणारी आपली कामे उरकून घेण्यासाठी भूमि अभिलेख कार्यालयात ये जा करत आहेत. परंतु तिथे कोणी नसल्यामुळे नुसते खेटे मारावे लागतात. त्यामुळे शेतक्यांचा वेळ व पैसा खर्च होतो.

परंतु महसूल व वन विभागाचा लेखाजोखा मांडणारे भूमि अभिलेख कार्यालय हे शासकीय वेळेनुसार उघडले जात नसल्याने तसेच अनेक वेळा कार्यालयाला टाळे लागलेले असल्याने या कार्यालयात ये जा करणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांना, शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच सर्व सामान्य नागरिक व शेतकऱ्यांचा वेळ पैसा वाया जात असल्याने संतापाची भावना उमटू लागली आहे.

तरी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामचुकारपणा करणाऱ्या भूमि अभिलेख कार्यालय उरणचे उप अधिक्षक एम. आय. अत्तार यांची खाते निहाय चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करत आहेत.

> उप अधिक्षक एम.आय. अत्तार हे फक्त भांडवलदारांची कामे करण्यासाठी कार्यालयात संध्याकाळी ये जा करत असतात ते सर्व सामान्य नागरिक शेतकरी याना वेळ देत नाहीत. कार्यालयाला १०- ३० नंतर ही टाळे असते.
> – विलास पाटील, शेतकरी

> मी अलिबाग येथे महत्वाच्या मिटीग साठी गुरुवार दि.१०) आलो आहे. तरी शासकीय वेळेनुसार कार्यालय का उघडले जात नाही यांची माहिती घेतो. तसेच लवकरच लवकर कार्यालयाचे टाळे उघडण्यासाठी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना सांगतो.
> – एम आय अत्तार
> उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय उरण

## निवडक



### हटाळे शाळेची शेतसहल

**कोर्लई :** शेतीचे महत्त्व, उपयोग व विविध पद्धती यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा. या उद्देशाने अलिबाग तालुक्यातील हटाळे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल डावाळे मेस्को येथील भास्कर थळे बंधुच्या शेतावर आयोजित करण्यात आली होती. सहल अध्यक्ष परी पवार व उपाध्यक्ष साई मोहिते यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडली. यावेळी भातशेतीच्या विविध टप्प्यांची तसेच पारंपरिक आणि आधुनिक पद्धतीने होणाऱ्या भात लावणी प्रक्रियेची सविस्तर माहिती प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून देण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भात लावणी करण्याची संधी देण्यात आली. त्याचप्रमाणे भाजीपाला लागवडीची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा जान्हवी घरत, शाळेच्या मुख्याध्यापिका रश्मी भोपी, डॉ. संदीप वारगे, सीमा नागावकर, विजया माळी, प्रीती कीर यांचे शैक्षणिक सहलीसाठी विशेष योगदान लाभले.



### शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याची दुर्दशा

**रसायनी :** खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली यांच्या हद्दीत सेंट जोसेफ ही आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा आहे. मात्र या शाळेकडे जाणारा रस्ता, याची दखल ना शाळा घेत, ना प्रशासन, या शाळेत जाणारे विद्यार्थी बस, इको रिक्षा तर काही विद्यार्थी चालत प्रवास करतात. बस व इको रिक्षा यांच्यापेक्षा चालत जाणारे विद्यार्थी हे सुखाने चालत जातात. अनेक विद्यार्थी आपल्या पालकांच्या सोबत जातात, त्यामुळे पालक रोजच वैतागलेले दिसतात. ज्या ठिकाणी बस गाडी, इको रिक्षा उभी असतात, त्याठिकाणी चिखलाने आपले साम्राज्य पसरले आहे.



### ओवे गावात वृक्षारोपण

**पनवेल :** पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आज जयकुमार सर्कल ते ओवे गावालगतच्या रस्त्याच्या दुतर्फ गुरुवार (दि.११) रोजी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, हरेश केणी, पापा पटेल, नागरिक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेंतर्गत शहरातील विविध ठिकाणी एक लाखाहून अधिक झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. महानगरपालिकेच्या विविध उद्यान केंद्रांवरून नागरिकांना मोफत देशी वृक्षांचे रोपे उपलब्ध करून दिली जात आहेत. या सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केली आहे. यावेळी खारघर प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, उद्यान विभागाचे पर्यवेक्षक नितीन राठोड, स्वच्छता निरीक्षक कुणाल गायकवाड, संदिप भोईर, अतुल मोहकर, महापालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. अकाऊंटंट (Accountant -Tally ERP+ GST, Advance Excel) वेटर, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मो. ७५५९१८४६१२
- नारळ पाहिजेत - आमच्याकडे नारळ विकत घेतले जातील. निर्वा इंटरप्रायझेस, आक्षी, अलिबाग मो नं. ९३७१२६३०३१/ ९७६३२५३०३१
- पिक-अप ४०७, आयशट डंपर वरील ड्रायवर पाहिजे आहेत झिराड आणि मांडवा येथील सपर्क : ८८०६६८३२३२ /८००७८९३२३२
- शिवानी पेटशॉप अलिबाग/चोंढी/पेण येथे कामाकरिता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६
- पाहिजेत- सिमरन मार्टस सेल्स साठी मुले-मुलींची भरती ; अनुभवी-बिन अनुभवी; शिक्षण कमीत कमी ग्रॅज्युवेशन पास Walking Interview दिनांक - १५-१६ जुलै २०२५ रोजी वेळ ११ ते १. संपर्क - R.C.F. Colony Gate, Veshwi, Tal-Alibag Mob. No-9223161461 / 9223161537
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहे. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास, ४) X-RAY साठी मुले, आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र सोबत आणावे. संपर्क : ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- अलिबागमधील थळमध्ये गर्व्हनमेंट फॅक्टरीकरीता फॅटरी सुपरवायझर, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, सिक्युरिटी ऑफिसर त्वरीत पाहिजे. संपर्क : ९८२१२७६२६१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वडघर पांगलोलीत गुरुपौर्णिमा साजरी

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन तालुक्यातील वडघर, पांगलोली या ठिकाणी असलेल्या श्री स्वामी समर्थ साधना केंद्र या ठिकाणी गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यात आला. या ठिकाणी हजारोच्या संख्येने भाविकांनी दर्शन घेतले. त्याचप्रमाणे महाप्रसादाचा लाभ घेतला. पहाटे पाद्यपूजन सोहळा पार पडला. पाद्यपूजन सोहळ्याचा मान प्रशांत कुलकर्णी व मेधा कुलकर्णी यांना मिळाला होता. या सर्व सोहळ्याचे पौरोहित्य जयंत जोशी, हरेश्वर व भूषण जोशी यांनी पार पाडले. मठामध्ये दिवसभर भजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## गोंधळपाडा शाळेत वह्या वाटप



| अलिबाग | वार्ताहर |

राजिप शाळा गोंधळपाडा येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप सोमवार (दि.७) जुलै रोजी अभिजीत जाधव यांनी सर्व विद्यार्थ्यांना वह्या तसेच शैक्षणिक साहित्य वाटप केले. त्यांचे वडील अशोक जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी हे शैक्षणिक साहित्य त्यांची आई अर्चना जाधव उपस्थित केले. जाधव हे गोंधळपाडा शाळेचे माजी विद्यार्थी असून सध्या जिल्हा परिषदमध्ये पाणीपुरवठा विभागामध्ये कार्यरत आहेत. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रश्मी राऊत यांनी जाधव यांचे आभार मानले.

## आरोग्य विभागातर्फे सिकलसेलची जनजागृती

| रसायनी | वार्ताहर |

रायगड जिल्हा परिषद शाळा वावंढळ येथे आरोग्य विभागामार्फत सिकलसेल आजाराविषयी जनजागृती कार्यक्रम ग्राम महसूल अधिकारी उदयसिंह देशमुख यांनी आयोजित केला होता. कार्यक्रमांमध्ये आरोग्य सेविका यांनी सिकल सेल आजाराविषयी माहिती, त्याची कारणे व त्याबाबत घ्यावयाची काळजी याबाबत उपयुक्त माहिती दिली.




सिकल सेल आजाराविषयी असलेल्या अज्ञानामुळे जीवित हानी होण्याची समस्या उद्भवू शकते हा आजार अनुवंशिक असल्यामुळे त्याचे त्याच्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याची मत प्रकट करण्यात आले. वेळेत उपचार घेतल्यास पुढील धोका टळू शकतो याविषयी योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी पत्रकार अर्जुन कदम, वावंढळ मुख्याध्यापिका योगिता पाटील, सर्व शिक्षक, ग्रामसेविका मंगल केदारे, आरोग्य विभागाच्या आरोग्य सेविका, तसेच आशा सेविका व ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेलची प्रतीशिर्डी म्हणून ओळखल्या जाणारा साई संस्थानच्या श्री साईबाबा मंदिरात गुरुपौर्णिमानिमित्त भक्तांनी सकाळपासून दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. (छायाचित्र-राजेश डांगळे)

## गुरुपौर्णिमेनिमित्त भक्तांची मांदियाळी

**पनवेल :** पनवेल पंचकोशीत असलेल्या विविध मंदिर, मठात गुरुपौर्णिमानिमित्त भक्तांची मंदीयाळी उसळली होती. शहरातील श्री स्वामी समर्थ मठ मंदिर, गावदेवी पाडा, रेल्वे स्टेशन मार्गावरील श्री साई नारायण बाबा मंदिर, दुर्गामाता मंदिर, इच्छापूर्ती गणेश मंदिर, लाईन आळी येथील मारुती मंदिर, नवनाथ मंदिर आदी ठिकाणी पहाटे पासूनच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक ठिकाणी काकड आरती, होम, हवन, पूजा अर्चा, महाआरती, महाप्रसाद, भजन- किर्तने यांचे आयोजन करण्यात आले होते.




## पुस्तके आली रुग्णालयाच्या दारी

| म्हसळा | वार्ताहर |

म्हसळा येथील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे म्हसळा ग्रामिण रुग्णालयातील रुग्णांचा तणाव आणि कर्मचाऱ्यांचा ताण कमी करण्यासाठी पुस्तके देण्यात आली. पुस्तके रुग्णांवर अनेक प्रकारे परिणाम करू शकतात, सकारात्मक आणि संस्कारक्षम दोन्ही चांगले वाचन रुग्णांना आराम देऊ शकते, त्यांची मानसिक स्थिती सुधारू शकते यासाठी डॉ. करण बेलकोने यांच्याकडे पुस्तके सुर्पुद करण्यात आली. यावेळी केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाचे संजय खांबेटे, सुनील उमरोटकर, महादेव पाटील, डॉ.करण बेलकोने, सागर सानप, सुनिल थळे, पाटील, ममता मोरे, अश्विनी जाधव, सुचिता शिंदे, सोनम सुखदरे, उदय करडे, बळीराम गिते, गौरी गायकवाड, प्राची मेंदडकर, शरद चव्हाण आदी उपस्थित होते.

## कृषी तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन




| महाड| वार्ताहर |

जिल्ह्यातील भूमिपुत्र शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली संलग्न कृषी महाविद्यालय मोहोप्रे रायगड येथील विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषी दिन साजरा केला.

या कार्यक्रमांमध्ये सर्व ग्रामस्थ व शेतकरी वर्ग यांचा सहभाग होता. कृषी दिन साजरा करून प्रत्येक गाव हरितशील व्हावे हा विचार मांडण्यात आला. त्याचबरोबर गावातील प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.जे. गिम्हवणेकर, प्रा. वी.आर. पवार, डॉ. एस. एस. रायकर, कार्तिकी पाटील, समृद्धी बांगर, साक्षी जाधव, पूजा पंडुरे, स्नेहा राऊत, तीर्था सातनाक, युवराज पोवळे, समीर पाथरे, धीरज तोरणे, आकाश रुपनर यांचा समावेश होता.

## ओम साई मंडळातर्फे पायी दिंडी

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील अध्यात्मिकतेचा व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या चिरनेर गावातील ओम साई सेवा मंडळातर्फे सालाबादप्रमाणे यावर्षी देखील गुरुपौर्णिमेनिमित्त चिरनेर ते साईमंदिर वहाळ पायी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मंडळातर्फे गेल्या बारा वर्षापासून मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली पायी पालखी दिंडीचे आयोजन करण्यात येते. पायी पालखी दिंडीचा शुभारंभ चिरनेर येथील श्री महागणपती मंदिरातून श्रींची महाआरती करून करण्यात आला.

याप्रसंगी राजेंद्र खारपाटील, भास्कर मोकल, अरुण पाटील, सचिन घबाडी, संजय पाटील, सुरेश पाटील, शुभांगी पाटील, संतोष ठाकूर, शशांक ठाकूर, प्रफुल्ल खारपाटील, समाधान ठाकूर, पद्माकर फोफेरकर, समीर डुंगीकर, निकिता नारंगीकर, नीलम चौलकर, समुद्रा म्हात्रे, भारती ठाकूर, जयश्री चिर्लेकर, यशोदा कातकरी, घनश्याम पाटील यांच्यासह चिरनेर ग्रामपंचायतीचे अन्य सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.



यावेळी गजानन फुंडेकर, बबन ठाकूर, हरिश्चंद्र मोकल, गजानन म्हात्रे, रमेश म्हात्रे, अमित मुंबईकर, नितीन नारंगीकर, संतोष चिर्लेकर प्रसाद पाटील सर्वांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

### शेतीत श्रम,वेळ,खर्चाची बचत | कृषि विभागातर्फे जनजागृती

# भाताची यांत्रिकी पध्दतीने लागवड

| नेरळ | प्रतिनिधी |

**सध्या भात शेती करताना मजुरांची टंचाई ही एक मोठी समस्या बनली आहे. दिवसेंदिवस मजुरांची उपलब्धता कमी होत असल्यामुळे भात लावणी करणे अधिकच अवघड झाले आहे. यामुळे उत्पादन खर्च वाढत असून वेळेवर शेती करणेही अशक्य होत चालले आहे. यावर उपाय म्हणून, यांत्रिक पद्धतीने भात लागवड करणे हे आजच्या काळातील एक प्रभावी व पर्यायात्मक तंत्रज्ञान आहे.**



शेतीमध्ये आणि शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी बदलाची दिशा देणारी भाताची यांत्रिकी पध्दतीने लागवड करण्याचा उपक्रम कृषी विभाग आणि प्रगत शेतकरी असीमकुमार सेन यांच्या माध्यमातून राबविला गेला. या भात लागवड प्रात्यक्षिक पाहणीसाठी असंख्य शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. असीमकुमार सेन यांनी विकसित केलेल्या या भात लागवड यंत्राचे जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याकडून कौतुक करण्यात आले.

यामुळे शेतीत श्रम, वेळ आणि खर्च या तिन्ही बाबतीत मोठी बचत होते. कृषी क्षेत्रात यांत्रीकरणाचा वापर वाढवण्याच्या दृष्टीने कृषि विभागामार्फत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे.महाराष्ट्रातील भात शेती ही अनेक शेतकऱ्यांची प्रमुख उपजिविका आहे. मात्र सध्याच्या बदलत्या परिस्थितीत पारंपरिक भात लागवडीस अनेक अडचणी निर्माण होत आहेत. मजूरटंचाई, वाढती मजुरी, कमी वेळेत जास्त क्षेत्रावर लागवड करण्याची गरज अशा अनेक अडथळ्यांमुळे शेतीत नवे पर्याय शोधणे अनिवार्य झाले आहे. अशा वेळी आधुनिक कृषी यांत्रिकीकरण हे एक प्रभावी व पर्यावरणपूरक उत्तर ठरत आहे.

मुगपे येथील ओआरजी फार्म येथे भाताची लागवड प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे, उप विभागीय कृषी अधिकारी सुनील निबाळकर, तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे, मंडळ कृषी अधिकारी दिनेशकुमार कोळी, उप कृषी अधिकारी कर्जत शशिकांत गोसावी, नेरळ मंगेश गलांडे, सचिन केणे, किरण गंगावणे, विजय गंगावणे, असीमकुमार सेंन, काशिनाथ फुलावरे, हेमंत कोंडीलकर, भरत राणे, पंढरीनाथ दाभाडे, काशिनाथ धुले, रामदास माली, रवींद्र जाधव, सुरेश जाधव, रमेश शेळके, तुकाराम लोभी, नवनाथ शेळके, तसेच तालुक्यातील १५० प्रगतीशील शेतकरी उपस्थित होते.

> **भात लावणी यंत्राचे वैशिष्ट्ये**
>
> भात लावणी यंत्र हे ट्रेमध्ये तयार केलेली रोपे अगदी अचूक व योग्य अंतरावर लावण्याचे कार्य करते. यामुळे फक्त लागवडीचा वेळच वाचत नाही तर उत्पादनामध्येही लक्षणीय वाढ होते. शेतकऱ्यांच्या कष्टात बचत होते आणि उत्पादनात सातत्य ठेवता येते.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि.रायगड)**

ज.म.र अर्ज २४६/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. साजिदाबेगम अफझल हुर्झुक,
रा. मुरुड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड, अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा, सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. साजिदाबेगम अफझल हुर्झुक, यांचा जन्म दि. २२/०९/१९४९ रोजी राहत्या घरी मौजे आगरदांडा, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा, कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अॅण्ड डेथ अॅक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्रीम. साजिदाबेगम अफझल हुर्झुक, यांचा जन्म दि. २२/०९/१९४९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयात दि. ५/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(संजय तवर)**
प्र. तहसिलदार मुरुड-जंजिरा

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक राजेश कृष्णा भोळे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३८ | १ अ | १-९१-००<br>पैकी १-२०-०० | १-७५ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. ११/०७/२०२५

**अॅड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकती तिचे मालक श्री. सत्यम चंपकलाल ओसवाल रा. पार्श्व बंगला, खोपोली, ता. खालापुर, जि. रायगड, ४१०२०३ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे - माणकिवली, ता. खालापुर, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २१ | - | ०-१६-०० | ०-८३ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर देणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १०/०७/२०२५

**अॅड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को. ऑप. हौ.सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

**सिडको** शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र / करारनामा)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे इरादापत्र दिले असून **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र हे.आर. | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे ८८३ | सोनखार ७ | १०/४<br>१०/२५<br>१२/२६ | ०-५-१<br>०-१६-७<br>०-१०-२ | ३०० चौ.मी. | नोड उलवे येथील भूखंड क्र.२५३, सेक्टर-१९, क्षेत्र -२९६.२४ चौ.मी. | गोपाळ अंबाजी पाटील(मयत) कै ठकूबाई हरी मढवी उर्फ ठकूबाई लक्ष्मण म्हात्रे (मयत) कै गंगूबाई गंगाराम ठाकूर (मयत) यांचे वारस १.श्रीमती पार्वतीबाई गोपाल पाटील २. श्री प्रल्हाद गोपाळ पाटील ३. श्री कपिलमुनी गोपाळ पाटील ४. श्रीमती वत्सला गजानन ठाकूर ५.श्रीमती सुनेत्रा सुरेश तारे ६.श्री बाळकृष्ण गंगाराम ठाकूर | निरंक |
| २ | उलवे ८९४ | उलवे १५१<br>उलवे १५१ | ४९/०<br>३८/०<br>४१/५<br>४३/६<br>४५/४ | ०-६-०<br>०-३७-०<br>०-२५-०<br>०-१२-१<br>०-१७-० | ४०० चौ.मी.<br>व<br>४५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.७७A, सेक्टर-१०B, क्षेत्र-८५० चौ.मी. | कै. गोकूळ उर्फ गोकूळया पदया उर्फ पद्दया पाटील (मयत), कै.काळया पदया पाटील (मयत), कै. तुकाराम कृष्णा पाटील (मयत), कै. हिराबाई उर्फ निराबाई लिकूर कोळी (मयत), कै. नर्मदाबाई दत्तात्रेय उर्फ दत्तू कोळी (मयत), कै. बारक्या पदया पाटील (मयत), कै. रामा पदया पाटील (मयत) व कै. चांगूबाई रामा पाटील यांचे वारस व हक्कसोडपत्रान्वये लाभार्थी भुधारक १) श्रीमती राधाबाई कृष्णा कोळी, २) श्री. जनार्दन नारायण कोळी, ३) श्री. कमळाकर नारायण कोळी, ४) श्री. सुधाकर नारायण कोळी, ५) श्री. बाळकृष्ण नारायण कोळी, ६) श्री. चिंतामण दत्तू कोळी, ७) श्री. बाळाराम बारक्या पाटील, ८) श्री. गजानन बारक्या पाटील, ९) श्रीमती श्रावणी कृष्णा पाटील, १०) श्रीमती चंद्राबाई काशीनाथ कोळी, ११) श्रीमती मालूबाई बारक्या पाटील उर्फ शर्मिला रमेश पाटील | -- |
| ३ | उलवे १२०१ | उलवे २५३+१५६A | ७१/५A | ०-६९-० | ६०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.३१, सेक्टर-२१, क्षेत्र-५९९.९८ चौ.मी. | कै. बबन बुधाजी मढवी उर्फ पाटील (मयत) यांचे वारस १) श्री. लक्ष्मण बबन पाटील उर्फ मढवी, २) श्रीमती आशा जगन्नाथ पाटील उर्फ मढवी, ३) श्री. सचिन जगन्नाथ पाटील उर्फ मढवी, ४) श्री. अमोल जगन्नाथ पाटील उर्फ मढवी, ५) श्री. प्रदिप जगन्नाथ पाटील उर्फ मढवी व ६) श्रीमती कमला मदन म्हसकर | -- |
| ४ | रोडपाली १८३ | ११९ | १६+१७ ते २९+१३० ते १४१+ १४७/४३८/२८५ | ०-३८-४ | ३५० चौ.मी. | भूखंड क्र.७८, सेक्टर-१६ई, क्षेत्र-३५० चौ.मी. रोडपाली नोड | कै. नामदेव विठु पालेकर (मयत) यांचे वारस १) उंदीर नामदेव पालेकर २) कृष्णा नामदेव पालेकर ३) बाबा नामदेव पालेकर (मयत) यांचे वारस ३.१) फशीबाई बामा पालेकर, ३.२) समीत बामा पालेकर | निरंक |
| ५ | रोडपाली १४४ | ३अ/१० | १२१/६ | ०-२१-० | **५०० चौ.मी.** | **भूखंड क्र. १३अ, सेक्टर- १६ई, क्षेत्र ४४७.८० चौ.मी. रोडपाली नोड** | **कै. गोमा गण्या पाटील (मयत)** यांचे वारस श्री. रामदास गोमा पाटील (मयत) यांचे वारस १.१) श्रीमती. पार्वती रामदास पाटील, १.२) श्री. अरुण रामदास पाटील व १.३) श्री. राम रामदास पाटील व २) कै. चंद्रकांत गोमा पाटील(मयत) यांचे वारस २.१) श्रीमती सुमती चंद्रकांत पाटील, २. २) श्री. विलास चंद्रकांत पाटील व २.३) श्री. महादेव चंद्रकांत पाटील | निरंक |
| ६ | | ५५ | ४३७/१३५<br>४३७/१७५<br>४३७/१८३ | ०-१९-०<br>०-०५-०<br>०-१२-१ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्धी झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**१२.५ टक्के भूमी विभाग,**
**सिडको भवन, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१५६/२०२५-२६

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील अलिबाग नगरपालिकेच्या हद्दीतील व दुय्यम निबंधक अलिबाग यांच्या अधिकार क्षेत्रातील सिटी सर्व्हे नं. १२१५ ए/१, १२१५ ए/२, १२१५ बी, १२१५ के, १२१६ आणि १२१६/१ यावर बांधण्यात आलेली हिराबाग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या इमारतीमधील 'सी विंग' मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका ०४, क्षेत्र ५९५ चौ. फुट बिल्टअप (५५.२९ चौ. मीटर) ज्यास अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000001985, जुना मालमत्ता क्र. z1CL0002000 ही मिळकत आज श्री. मंगेश दत्तात्रेय हळदवणेकर व सौ. भारती मंगेश हळदवणेकर रा. अलिबाग यांच्या नावे असेसमेंट रेकॉर्डला नोंदलेली आहे. सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशीलांस विकत देण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझ्या आशिलांस दिला आहे. सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, भाडेकरार, ताबेकब्जा वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १०/०७/२०२५

**(अॅड. प्रतिमा खोत)**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड,
९९२१२५४६३०

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील (जुना सर्व्हे नं. ६९/३ + ६९/४अ + ६९/४ ब + ७०/१ + ७१/१) ज्यास नविन सर्व्हे नं. ६९/३, प्लॉट नं. १७, नागडोंगरी या मिळकती मधील चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील बांधण्यात आलेल्या "श्री दत्तात्रेय को ऑप हौसिंग सोसायटी लि." या इमारतीतील चढता तळ मजल्यावरील ऑफीस/शॉप क्र. ६, क्षेत्र ३४४ चौ. फुट बिल्टअप, (३१.९६ चौ. मीटर) (चेंढरे ग्रामपंचायत क्र. १९९१/३०) ही मिळकत आज श्री. मिलिंद दत्तात्रेय पाटील, रा. पंतनगर, चेंढरे, अलिबाग यांच्या नावे असेसमेंट रेकॉर्डला नोंदलेली आहे. सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशीलांस विकत देण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझ्या आशिलांस दिला आहे. सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, भाडेकरार, ताबेकब्जा वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :-१०/०७/२०२५

**(अॅड. परेश एम. घरत )**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस.टी. स्टॅण्डजवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड,
९८५०४८१२३४

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)**

ज.म.र अर्ज २४५/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. बिलकीस खलिक हुरझुक,
रा. ५०४, मेगनस रेसीडेन्सी प्लॅट, अर्जदार
नेरुळ, नवी मुंबई, ठाणे
विरुद्ध
ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा, सामनेवाला
ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्रीम. बिल्कीस खलिक हुरझुक, यांचा जन्म दि. २३/०८/१९५८ रोजी राहत्या घरी मौजे आगरदांडा, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत आगरदांडा कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अॅण्ड डेथ अॅक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्रीम. बिल्कीस खलिक हुरझुक, यांचा जन्म दि. २३/०८/१९५८ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयांत दि. ५/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागाहुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०१/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(संजय तवर)**
प्र. तहसिलदार मुरुड-जंजिरा

नि.क्र. १७/ड

प्रो.फी. जमा : अर्जदाराची वकील श्री. आझमा अल्ताफ कुरेशी

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
जिल्हा : रायगड

दिवाणी चौकशी अर्ज क्र. : ६२/२०२३

१) तौफीक अब्दुल सत्तार नागोठणेकर
वय ४३ वर्षे, धंदा-शेती
राहणार- फ्लॅट न्यू ४१०, एफ विंग,
जे.जे.सी, टेलिफोन एक्सचेंज जवळ,
वांद्रे वस्ती, मुंबई ४०० ०५०.
क्र. १ स्वतःकरीता व क्र. २ ते ४ यांचा अखत्यारी
२) झीनत फहीम कुरेशी
वय ४७ वर्षे, धंदा-गृहिणी,
राहणार- घर नं. ००३, वफा पार्क,
अलमास कॉलनी, कोसा, मुंब्रा, ... अर्जदार
ठाणे ४०० ६१२
३) झहूर सत्तार नागोठणेकर,
वय ४४ वर्षे, धंदा- नोकरी,
राहणार- एफ विंग, फ्लॅट नं. ४१०,
जमाते ई जामीरीया कॉलनी,
कृश्नचंद्र मार्ग, एम.टी.एन.एल.
एक्सचेंज जवळ, बांद्रा वेस्ट,
मुंबई ४०० ०५०
४) मुसारात सत्तार नागोठणेकर,
वय ३४ वर्षे, धंदा-गृहिणी,
राहणार- रूम नं. ४१०, ४ फ्लोअर,
एफ विंग, जे.जे. कॉलनी, के.सी. मार्ग,
एम.टी.एन.एल. टेलिफोन एक्सचेंज
जवळ, वांद्रे वेस्ट, मुंबई ४०० ०५०
विरुद्ध
मुस्तफा अब्दुलसत्तार नागोठणेकर,
वय ४६ वर्षे, धंदा- नोकरी,
राहणार- एफ विंग, फ्लॅट नं. ४१०, ... सामनेवाले
जे.जे. कॉलनी, के.सी. मार्ग, एमटीएनएल
तेल एक्सचेंज जवळ, बांद्रे वेस्ट,
मुंबई ४०० ०५०

या जाहीर नोटीसने तमाम लोकांस कळविण्यात येते की,

पै. अब्दुल सत्तार इब्राहीम नागोठणेकर व त्यांची पत्नी पै. फातिमा अब्दुल सत्तार नागोठणेकर यांच्या मालकीच्या व ताबेकब्जा, वहिवाटीच्या खाली वर्णन केलेल्या स्थावर व जंगम मिळकती आहेत.

**मौजे वेळास्ते, तालुका मुरूड, जिल्हा रायगड येथील स्थावर मिळकत.**

| अ. क्र. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | वेळास्ते ता. मुरूड | ५० | ०-९९-००<br>पो.ख. ०-०८-००<br>एकूण १-०७-०० | १.१९ |

जंगम मिळकती- मयत यांचे खालील बँकांमध्ये खाते आहेत, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | वर्णन |
|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया, शाखा मुरूड-जंजिरा<br>नाव :- अब्दुल सत्तार इब्राहिम नागोठणेकर<br>खाते नं. १२१११०१०००२४३८<br>रक्कम- ३२,८१६.२७/- |

पै. अब्दुल सत्तार इब्राहीम नागोठणेकर व पै. फातिमा अब्दुल सत्तार नागोठणेकर यांना अर्जदार व सामनेवाला व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्याकरीता अर्जदार व सामनेवाला हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत असा 'वारस दाखला' मिळण्याकरीता सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणालाही व्यक्तीगत हरकत करावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मा. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती घ्यावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मा. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील व पै. अब्दुल सत्तार इब्राहीम नागोठणेकर व पै. फातिमा अब्दुल सत्तार नागोठणेकर यांचे वारसपत्रास अर्जदार हक्कदार आहेत असे शाबीत झाल्यास त्यांना 'वारस दाखला' मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक ०५ माहे जुलै सन २०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय,
व स्तर-अलिबाग
जि. रायगड

कोर्टाचा शिक्का

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,
व स्तर-अलिबाग
जि. रायगड

## उपविभागीय अधिकारी सुधागड, जि. रायगड यांच्या न्यायालयात
**जाहीर नोटीस**

**सुनावणीची नोटीस** **आर.टी.एस. अपिल नं. ७३/२०२५**

१.श्री. सुशिल नारायण कौशिक तर्फे अखत्यारी श्री. सुभाष मानकर अपिलार्थी
रा. मुळशी, ता. सुधागड, जि. रायगड अपिलार्थी
विरूद्ध
१) तलाठी सजा राबगाव
२) मंडळ अधिकारी पाली
३) तहसिलदार सुधागड
४) श्री. मारूती नारायण मोरे
५) लक्ष्मण नारायण मोरे
क्र. ४ व ५ रा. राबगाव, ता. सुधागड, जि. रायगड
६) श्रीम. अनुसया काळुराम गायकवाड
रा. ढोकशेत, पो. दहिगाव, ता. सुधागड
७) श्रीम. रंजना नारायण गायकवाड
मु. वाघोशी, पो. भेरव, ता. सुधागड, जि. रायगड
८) श्रीम. शोभा प्रकाश भोईर
मु. पाटणसई, ता. रोहा, जि. रायगड
९) मनिषा पिठू कांबळे, मयत वारस उत्तरार्थी
९/१ राहूल पिठू कांबळे
९/२ संध्या संदीप क्षिरसागर
९/३ अमोल पिठू कांबळे
९/४ सिद्धार्थ पिठू कांबळे
९/१ ते ९/४ रा. कानसळ, ता. सुधागड, जि. रायगड
९/५ सौ. शितल मोहन क्षीरसागर
रा. हाळखुर्द, पो. खालापूर, ता. खालापूर, जि. रायगड
१०) श्रीम. आशा विजय तांबे
रा. सिद्धार्थ साई सेवा केंद्र, भिमनगर, आकुर्ली रोड,
पटेल स्टँडजवळ, दामुनगर, कांदीवली प. मुंबई ४०० १०१
११) श्री. कैलास बाळाराम वाघमारे
१२) श्री. अभिजित बाळाराम वाघमारे
क्र. ११ व १२ रा. रासळ, ता. सुधागड, जि. रायगड

सर्व संबंधितांना या नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी या न्यायालयात मौजे राबगाव, ता. सुधागड येथील गट नं. ३३/४ या मिळकतीमधील फेरफार क्र. २२३० च्या विरोधात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये या कार्यालयात दाखल अपिल दाखल केले आहे.

सबब या नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की, या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी संबंधितांनी दिनांक २१/०७/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, सुधागड येथे आमचे कार्यालयात सकाळी १२-०० वाजता आपण स्वतःचा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे. नमूद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि. ०९/०७/२०२५

सही/-
**(सायली ठाकूर)**
उपविभागीय अधिकारी सुधागड
उपविभाग रोहा

## निवडक

### रत्नागिरीचा अविराज गाजवतोय इंग्लंडचे क्रिकेट मैदान



**रत्नागिरी :** रत्नागिरीचा युवा क्रिकेटपटू अविराज अनिल गावडे हा सध्या तेथील नामांकित कौंटी क्रिकेट स्पर्धा खेळण्याकरिता इंग्लंडमध्ये असून तो मिडलसेक्स संघाकडून खेळत आहे. नुकत्याच झालेल्या स्पर्धेत मिडलसेक्स संघ व रिंजेट्स् पार्क या संघात झालेल्या सामन्यामध्ये अविराज याने गोलंदाजी, फलंदाजी व क्षेत्ररक्षणात आपले कौशल्य दाखवत संघाला विजयी करण्यात मोठा वाटा उचलला. त्यामुळे त्याला या सामन्यात सामनावीर पुरस्कार देण्यात आला. मिडलसेक्स संघाकडून खेळताना त्याने सुरुवातीला गोलंदाजी करताना षटकांममध्ये फक्त १६ धावा देऊन ४ बळी घेत प्रतिस्पर्धी संघाला हादरा दिला. त्यामध्ये २ बळी क्लीनबोल्डद्वारे तर २ बळी झेल घेऊन घेतल्या आहेत. क्षेत्ररक्षण करताना त्याने चपळाई दाखवत एका फलंदाजाला धावबादही केले. आपल्या मिडलसेक्स संघासाठी फलंदाजी करताना त्याने सलामीला येऊन ६० चेंडूंमध्ये ४७ धावा काढल्या. त्यामध्ये ५ चौकार व १ षटकार मारत ७८च्या सरासरीने धावा करीत संघाला विजय मिळवून दिला. अविराज याने दाखवलेल्या दमदार कामगिरीमुळे त्याला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याआधी अविराज याने दोन सामन्यांत सामनावीर पुरस्कार मिळविले होते. रत्नागिरीतील अविराज याने आपल्या दमदार कामगिरीमुळे इंग्लंडमध्ये छाप पाडली असून रत्नागिरी जिल्ह्याचे नावही उज्ज्वल केले आहे.

### अल्कराझचा झंझावात कायम



**लंडन :** विम्बल्डनच्या हिरवळीवरील जेतेपदाची हॅटट्रिक स्पॅनिश कार्लोस अल्कराझपासून दोन पावले दूर आहे. त्याने पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत ब्रिटनच्या पॅमरुन नोरीचा ६-२, ६-३, ६-३ असा अवघ्या ९९ मिनीटांत फडशा पाडला. आता त्याची गाठ अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झशी पडणार आहे. फ्रिट्झने शानदार खेळ दाखवत उपांत्यपूर्व फेरीच्या पहिल्या लढतीत रशियाच्या १७व्या मानांकित करेन खाचानोव्हचा ६-३, ६-४, १-६, ७-६(४) असा पराभव केला. त्याने प्रथमच उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली आहे. पुरुष एकेरीच्या पहिल्या दोन्ही लढती एकतर्फी झाल्या. अल्कराझच्या झंझावातापुढे पॅमरून नोरीचे काहीएक चालले नाही. एकाही सेटमध्ये नोरी अल्कराझला झुंज देऊ शकला नाही. त्यामुळे सामना १ तास ३९ मिनीटांत आटोपला. दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात सुरुवातीची दोन सेट्स सहज जिंकल्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये फ्रिट्झला हार पत्करावी लागली. मात्र, चौथ्या सेटमध्ये दोघांमध्ये चुरस झाली आणि टायब्रेकमध्ये ४-४ अशी बरोबरी असताना फ्रिट्झने शेवटी निर्णायक खेळी करत सामना जिंकला. जगातील पाचव्या क्रमांकाच्या या खेळाडूने यंदा पहिल्यांदाच विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

### शुभमन गिलची फलंदाजीत मोठी झेप



**लंडन :** इंग्लंडविरुद्ध बर्मिंगहॅममधील दुसऱ्या कसोटीत जबरदस्त कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलने कसोटी क्रिकेटच्या फलंदाजी क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. त्याने १५ स्थानाने प्रगती करत कारकीर्दीतील सर्वोत्तम सहाव्या स्थानावर उडी घेतली आहे. इंग्लंडचा फलंदाज हॅरी बुकने आपला संघसहकारी जो रूटला मागे टाकत अव्वल स्थान काबीज केले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदने बुधवारी जाहीर केलेल्या नव्या कसोटी क्रमवारीनुसार एजबॅस्टनमध्ये पहिल्या डावात १५८ धावा करणाऱ्या ब्रुकने जो रूटला मागे टाकून पहिले स्थान मिळवले आहे. तो आता रूटपेक्षा १८ गुणांनी पुढे आहे. जो रूट आता दुसऱ्या स्थानी घसरला आहे. दुसऱ्या कसोटीत २६९ व १६१ धावांच्या ऐतिहासिक खेळी करणारया शुभमन गिलने १५ स्थानांची झेप घेत सहावे स्थान गाठले आहे. ही त्याच्या कारकीर्दीतील सर्वोत्तम ८०७ गुणांची रेटिंग कामगिरी ठरली आहे.

### मास्टर-ब्लास्टरचा अनोखा सन्मान

**लंडन :** क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्स क्रिकेट स्टेडियमवर भारत-इंग्लंड यांच्यात अँडरसन-तेंडुलकर चषक कसोटी मालिकेतील तिसरा सामना खेळवला जात आहे. लॉर्ड्स हे प्रसिद्ध स्टेडियम असून त्याला मोठा इतिहासही आहे. दरम्यान, या स्टेडियममध्ये संग्रहालय देखील आहे. त्यामध्ये क्रिकेटच्या अनेक वस्तू ठेवलेल्या आहेत. गुरुवारपासून सुरू झालेल्या भारत-इंग्लंड यांच्यातील तिसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी भारताचा मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा मोठा सन्मान करण्यात आला. सचिनच्या उपस्थितीत लॉर्ड्समधील संग्रहालयात त्याच्याच चित्राचे अनावरण करण्यात आले आहे. हे चित्र प्रसिद्ध चित्रकार स्टुअर्ट पिअरसन राईट यांनी काढले आहे. हे चित्र या वर्षाच्या अखेरपर्यंत संग्रहालयात ठेवण्यात येईल. त्यानंतर ते पॅव्हेलियनमध्ये लावले जाईल. पॅव्हेलियनमध्ये अनेक दिग्गज खेळाडूंची चित्र आहेत. सचिनचे हे चित्र १८ वर्षांपूर्वी मुंबईतील घरात काढलेल्या एका फोटोवरून काढण्यात आले आहे. हे चित्र ब्रेडेड अॅल्युमिनियमवर ऑइल पेंटिंगने काढण्यात आले आहे. सचिन तेंडुलकरचे चित्र हे या संग्रहात असलेले पाचव्या भारतीय क्रिकेटरचे चित्र आहे. याआधी त्यांच्या संग्रहात कपिल देव, बिशन सिंग बेदी, दिलीप वेंगसरकर यांचीही चित्र आहेत. पण ही चित्र पूर्ण उंचीची आहेत.

# भारताच्या महिलांनी रचला इतिहास

- ६ गडी राखून इंग्लंडला पराभवाचा धक्का
- मालिकेत ३-१ अशी विजयी आघाडी





**। मँचेस्टर । वृत्तसंस्था ।**

सध्या भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर आहेत. त्यातच भारताच्या महिला क्रिकेट संघाने बुधवारी (दि.९) इतिहास घडवला आहे. मँचेस्टरला झालेल्या चौथ्या टी-२० सामन्यामध्ये भारतीय महिला संघाने इंग्लंडच्या महिला संघाला ६ गडी राखून पराभवाचा धक्का दिला. त्यासोबत भारताच्या संघाने ५ सामन्यांच्या मालिकेत ३-१ अशी विजयी आघाडी मिळवली आहे. त्यामुळे भारताचा या मालिकेतील विजयही निश्चित झाला असून हा मालिका विजय भारतीय संघासाठी ऐतिहासिकही ठरला आहे.

बुधवारी झालेल्या सामन्यात इंग्लंडने भारतासमोर विजयासाठी माफक १२७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारतीय महिला संघाने १७ षटकातच ४ गडी गमावत पूर्ण केला. या सामन्यात राधा यादवने अत्यंत किफायतशीर गोलंदाजी करत विजयात मोलाचा वाटा उचलला. भारताकडून स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी सलामीला फलंदाजी करताना आक्रमक सुरूवात केली होती. त्यांनी सलामीला अर्धशतकी भागीदारीही केली. परंतु, ७ व्या षटकात शफाली ३१ धावांवर झेलबाद झाली. पाठोपाठ ९ व्या षटकात स्मृती मानधनालाही ३२ धावांवर माघारी फिरावे लागले. त्यानंतर जेमिमाह रोड्रिग्स आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी डाव पुढे नेला. त्यांच्यातही चांगली भागीदारी होत होती. त्यांनीही तिसऱ्या बळीसाठी ४८ धावांची भागीदारी केली. मात्र, हरमनप्रीत कौर विजयासाठी केवळ १० धावांची गरज असताना १६ व्या षटकात बाद झाली. पाठोपाठ १७ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर अमनज्योत कौर २ धावांवर धावबाद झाली. मात्र, उर्वरित ८ धावा ऋचा घोष आणि जेमिमाहने पूर्ण करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. जेमिमाह २४ धावांवर नाबाद राहिली, तर ऋचा ७ धावांवर नाबाद राहिली. इंग्लंडकडून गोलंदाजी करताना चार्लोट डिन, सोफी इक्लेस्टोन आणि इजी वाँग यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

तत्पुर्वी, इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ बाद १२६ धावा केल्या होत्या. इंग्लंडकडून सोफीया डंकलीने सर्वाधिक २२ धावांची खेळी केली. तसेच, कर्णधार टॅमी ब्युमॉंटने २० धावा केल्या. त्यांच्याशिवाय कोणालाही २० धावांचा टप्पा पार करता आला नाही. याशिवाय भारतीय गोलंदाजांनी किफायतशीर गोलंदाजी केल्याने इंग्लंडच्या फलंदाजांना मोठे शॉट्सही खेळता आले नाही. डंकली आणि ब्युमॉंटव्यतिरिक्त ऍलिस कॅप्सी (१८), पेज स्कॉलफिल्ड (१६), सोफी इक्लेस्टोन (नाबाद १६) आणि इजी वाँग (नाबाद ११) यांनी दोन आकडी धावसंख्या पार केली, परंतु, कोणीही मोठी खेळी करू शकले नाहीत. भारताकडून गोलंदाजी करताना राधा यादवने २ बळी घेतले. याशिवाय अरुंधती रेड्डीला विकेट मिळाली नसली, तरी तिने किफायनतशीर गोलंदाजी केली. श्री चरणीने २ बळी घेतले, तर दीप्ती शर्माने आणि अमनज्योत कौरन प्रत्येकी १ बळी घेतला.

**चौथ्या सामन्यात दमदार पुनरागमन**

**या संपूर्ण मालिकेत भारतीय संघाने दमदार कामगिरी केली. पहिल्या दोन्ही सामन्यात भारताने विजय मिळवला होता. तिसऱ्या सामन्यात थोडक्यात पराभवाचा सामना भारताला करावा लागला होता. मात्र, चौथ्या सामन्यात पुन्हा विजयी मार्गावर परतत भारतीय संघाने मालिका काबीज केली. भारतीय महिला संघाने इंग्लंडमध्ये टी-२० मालिका जिंकण्याची ही पहिलीच वेळ ठरली आहे. यापूर्वी झालेल्या ६ द्विपक्षीय टी-२० मालिकेत भारतीय संघाला इंग्लंडमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. या मालिकेत उपकर्णधार स्मृती मानधनाची कामगिरी चांगली झाली आहे. तिने एक शतक आणि एका अर्धशतकासह सर्वाधिक २१३ धावा चोपल्या आहेत. चौथ्या सामन्यातही तिनेच भारताकडून सर्वोच्च धावा केल्या आहेत.**

## संघात जसप्रीत बुमराहचे पुनरागमन



**। लॉर्ड्स । वृत्तसंस्था ।**

भारत आणि इंग्लंड संघ सध्या अँडरसन-तेंडुलकर चषक २०२५ या कसोटी मालिकेत व्यग्र आहेत. पाच सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना प्रतिष्ठीत लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर गुरूवार दि.१० जुलै पासून खेळवला जात आहे. ही मालिका सध्या १-१ अशी बरोबरीत असल्याने तिसरा सामना दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा आहे. हा सामना जिंकणारा संघ मालिकेत आघाडी घेईल. तसेच, या कसोटी सामन्यात आर्चर आणि बुमराहचे पुनरागमन झाले आहे.

तिसऱ्या कसोटीत देखील इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकली आहे. याआधीच्या दोन्ही सामन्यातही त्याने नाणेफेक जिंकली होती. तिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून स्टोक्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यासाठी एक दिवस आधीच इंग्लंडने प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली होती. इंग्लंडने त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरला निवडले आहे. त्यामुळे २०२१ नंतर पहिल्यांदाच आर्चर कसोटी क्रिकेट खेळताना दिसणार आहे. त्याला सातत्याने होणाऱ्या दुखापतींमुळे गेली चार वर्षे कसोटी क्रिकेटपासून दूर राहिला होता. त्याला जोश टंगच्या जागेवर संधी देण्यात आली आहे. दरम्यान, भारताच्या संघातही जसप्रीत बुमराहचे पुनरागमन झाले आहे. बुमराहला दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी विश्रांती दिली होती. परंतु, आता त्याला पुन्हा प्लेइंग इलेव्हनमध्ये सामील करण्यात आले आहे. बुमराहला प्रसिद्ध कृष्णाच्या जागेवर संधी देण्यात आली आहे. हा एकमेव बदल भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये करण्यात आला आहे.

## इगा स्विअतेकची उपांत्य फेरीत धडक

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

पोलंडची २४ वर्षीय टेनिसपटू इगा स्विअतेक हिने विम्बल्डन ग्रँडस्लॅम या प्रतिष्ठेच्या टेनिस स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे. तिने महिला एकेरीच्या लढतीत रशियाच्या लिऊडमिला सॅमसोनोवा हिच्यावर सरळ दोन सेटमध्ये विजय मिळवला आणि पहिल्यांदाच या स्पर्धेच्या अंतिम चारमध्ये प्रवेश केला. इगा स्विअतेक हिने चार वेळा फ्रेंच ओपन ग्रँडस्लॅमच्या जेतेपदावर मोहर उमटवली आहे. तसेच, एक वेळा अमेरिकन टेनिस ग्रँडस्लॅम जिंकण्यातही तिने यश संपादन केले आहे.

## रितिका हुडा चार वर्षांसाठी निलंबित



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक पटकावणारी आणि २३ वर्षांखालील जागतिक स्पर्धेत विजेती ठरलेली कुस्ती खेळाडू रितिका हुडा हिला चार वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. उत्तेजक चाचणीत दोषी सापडल्यामुळे राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक संस्थेकडून (नाडा) हा निर्णय घेण्यात आला आहे. भारतासाठी हा मोठा धक्का ठरला आहे.

आशियाई अजिंक्पयद स्पर्धेसाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. कुस्तीपटूंच्या निवड चाचणीदरम्यान १५ मार्च रोजी उत्तेजक चाचणीही घेण्यात आली. तिच्या 'युरिन' चाचणीदरम्यान प्रतिबंधित पदार्थाचा समावेश असल्याचे समोर आले आहे.

यापसंगी रितिका हूडा म्हणाली की, अजूनही काहीही निश्चित झालेले नाही. मी काहीही चुकीचे केलेले नाही. अधिकाऱ्यांना माझ्याकडून सहकार्य लाभणार आहे. नाडा व कुस्ती संघटनेवर माझा विश्वास आहे. यापेक्षा मी जास्त काही सांगू शकत नाही, असेही ती म्हणाली.

## इटली संघाचा स्कॉटलंडला धक्का



**। हेग । वृत्तसंस्था ।**

भारत आणि श्रीलंका या दोन देशांमध्ये पुढच्यावर्षी टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धा खेळवली जाणार आहे. सध्या या स्पर्धेसाठी युरोप विभागाची पात्रता फेरी सुरू आहे. या स्पर्धेसाठी तब्बल २० संघ सहभागी होणार आहेत. त्यासाठी जे संघ थेट पात्र ठरले नाहीत, अशा संघांना पात्रता फेरी खेळून मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरण्याची संधी असते. सध्या युरोप विभागाची पात्रता स्पर्धा सुरू असून या स्पर्धेत बुधवारी मोठा उलटफेर पाहायला मिळाला. बुधवारी (दि.९) इटलीच्या संघाने त्यांच्यापेक्षा बलाढ्य स्कॉटलंडला पराभवाचा धक्का दिला आहे. द हेग येथे झालेल्या साखळी फेरीत इटलीने स्कॉटलंडला १२ धावांनी पराभूत केले आहे. त्यामुळे इटली आता गुणतालिकेत अव्वल क्रमांकावर आहे. त्यांनी ३ पैकी २ सामने जिंकले आहेत, तर एक सामना रद्द झाला. त्यामुळे त्यांचे ५ गुण झाले आहेत. त्याखाली जर्सी आणि स्कॉटलंड हे दोन संघ आहेत.

## दक्षिण आफ्रिकेचा सलग दहावा विजय



**। बुलावायो । वृत्तसंस्था ।**

दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेने झिम्बाब्वेवर १ डाव २३६ धावांनी विजय मिळवत मालिका २-० अशी जिंकली. कर्णधार वियान मुल्डरच्या नाबाद ३६७ धावांच्या जोरावर आफ्रिकेने पहिला डाव ५ बाद ६२६ धावांवर घोषित केला. त्यानंतर झिम्बाब्वेला पहिल्या डावात १७० धावांवर गुंडाळून आफ्रिकेने फॉलोऑन दिला आणि दुसऱ्या डावात त्यांना २२० धावांवर गुंडाळले. परंतु, जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या मागील पर्वातील विजेत्या आफ्रिकेला या विजयाचा २०२५-२७ मध्ये काहीच उपयोग होणार नाही. कारण झिम्बाब्वेचा संघ कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा भाग नसल्याने आफ्रिकेच्या विजयाचे मालिकेत महत्त्व नाही.

प्रथम फलंदाजीला आलेल्या आफ्रिकेकडून मुल्डरने ३३४ चेंडूंत ४९ चौकार व ४ षटकारांसह ३६७ धावांची खेळी केली. त्याला डेव्हिड बेडिंगहॅम (८२), लहून-ड्रे-प्रेटोरियस (७८) यांची चांगली साथ मिळाली. डेवॉल्ड ब्रेव्हिस (३०) व कायले वेरेयने (४२) यांनीही चांगला खेळ केला. त्यानंतर झिम्बाब्वेचा पहिला डाव ४३ षटकांत १७० धावांवर गुंडाळला. सीन विलियम्सने ५५ चेंडूंत नाबाद ८३ धावांची खेळी करून संघर्ष केला. फॉलो ऑन स्वीकारून मैदानावर आलेल्या झिम्बाब्वेला दुसऱ्या डावात २२० धावाच करता आल्या. निक वेल्च (५५), कर्णधार क्रेग एर्व्हिन (४९) व ताकुडझवानाशे कैतानो (४०) यांनी चांगली खेळी केली. परंतु, इतरांनी पुन्हा निराश केले. आफ्रिकेसाठी दुसऱ्या डावात कॉर्बिन बॉशने ४, सेनुरान मुथूस्वामीने ३ आणि कोडी युसूफने दोन बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेचा हा सलग दहावा कसोटी विजय ठरला आहे.

## गोलंदाजाने स्टम्पच उभा चिरला

**। टाँटन । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट सामन्यांमध्ये अनेक विचित्र धावबाद, बळी आणि फलंदाजांना बाद झालेलं पाहिले आहे. जगातील अनेक अव्वल गोलंदाजांनी स्वप्नवत चेंडूंवर अनेक फलंदाजांना बाद केले आहे. काही गोलंदाजांनी तर फलंदाजांना त्रिफळाचीत करताना स्टम्पचे दोन तुकडेही केले आहेत. परंतु, ८ जुलैला झालेल्या व्हिटॅलिटी ब्लास्ट स्पर्धेतील सामन्यात एका गोलंदाजाने थेट स्टम्प उभा चिरला आहे. गोलंदाजाने फलंदाजाला त्रिफळाचीत केल्यानंतर स्टम्पचे सहसा दोन तुकडे होतात. परंतु, स्टम्प उभा कसा काय चिरला जाऊ शकतो, असा सर्वांनाच प्रश्न पडला आहे. मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजाने असा रॉकेट चेंडू टाकला आहे की, ही अनपेक्षित घटना सत्यात पाहायला मिळाली .

**१२व्या हंगामाच्या तारखा जाहीर | लिलावात खेळाडूंना १ कोटीहून अधिकची बोली**

# प्रो कबड्डी लीगचे बिगुल वाजले



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

प्रो कबड्डी लीगचे आयोजक मशाल स्पोर्ट्सकडून बुधवारी (दि.९) प्रो कबड्डी लीगच्या १२व्या हंगामाच्या महत्त्वाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. प्रो कबड्डी लीगचा नवा हंगाम शुक्रवार, २९ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. ११ रोमांचक हंगामाच्या यशानंतर, पीकेएल आता एका नवीन आणि अधिक उत्साही पर्वात प्रवेश करत आहे.

नव्या हंगामात गतविजेते हरियाणा स्टीलर्स त्यांचे विजेतेपद राखण्यासाठी मैदानात उतरणार आहेत. या लीगमधील स्पर्धात्मक समतोल आजही कायम असून, यामुळेच प्रो कबड्डी ही भारतातील सर्वाधिक रोमांचक खेळ स्पर्धांपैकी एक ठरली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लिलावाद्वारे सर्व बाराही संघांनी आपली ताकद वाढवली आहे, त्यामुळे यंदाचा हंगाम प्रेक्षकांना अद्वितीय स्पर्धा आणि मनोरंजन देणार, असा विश्वास आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला आहे. सामने कुठे खेळवले जाणार हे अद्याप जाहीर करण्यात आले नसले, तरी त्याबाबत लवकरच माहिती देण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रो कबड्डी लीगच्या १२व्या हंगामाचा लिलाव ३१ मे आणि १ जून रोजी मुंबई येथे पार पडला. या लिलावात १० खेळाडूंना १ कोटीहून अधिकची बोली लागल्याने नवा विक्रम नोंदवला गेला.

> **"पीकेएलच्या १२व्या हंगामाची सुरुवातीची तारीख जाहीर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. या वर्षीच्या ऐतिहासिक खेळाडू लिलावात १० खेळाडूंनी १ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला, ज्यामुळे यंदाचा हंगाम अधिक स्पर्धात्मक होणार आहे. चाहत्यांना कबड्डीचा आणखी एक थरारक अध्याय दाखवण्याची आम्हाला उत्सुकता आहे.**
>
> **- अनुपम गोस्वामी, मशाल स्पोर्ट्सचे बिझनेस हेड आणि प्रो कबड्डी लीग कमिशनर"**

**पारंपरिक खेळाला जागतिक व्यासपीठ**

**अॅमेच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली मशाल स्पोर्ट्स आणि जिओस्टार यांनी मिळून पीकेएलला भारतातील सर्वात लोकप्रिय आणि यशस्वी लीग्समध्ये स्थान मिळवून दिले आहे. भारतीय पारंपरिक खेळ कबड्डीला जागतिक व्यासपीठावर नेण्याचे श्रेय मोठ्या प्रमाणात या लीगला जाते. या मंचावरून अनेक नवोदित खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकता आले आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)